cmyk

## संपादकीय

### करिअर च्या नादात आनंद गमावू नका

तब्बल २८ लाख विद्यार्थ्यांना नीट परीक्षेचे वेध लागले आहेत. वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमासाठीची ही प्रवेश परीक्षा आहे. जी देशपातळीवर घेतली जाते. विद्यार्थ्यांची आतापर्यंतची ही विक्रमी संख्या मानली जाते. गतवर्षीच्या तुलनेत विद्यार्थ्यांची संख्या यंदा सुमारे सात लाखांनी वाढली आहे. मुले इयत्ता बारावीत गेली की त्यांच्या पालकांना त्यांच्या करिअरची दिशा ठरवण्याचे वेध लागतात. मुलांनी चांगले शिक्षण घ्यावे आणि त्याआधारे त्यांचे भवितव्य मार्गी लागावे हाच पालकांचा त्यामागचा उद्देश असतो. तथापि त्यासाठी मुलांच्या मनाचा कल हा महत्त्वाचा घटक आहे.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### महाविकास आघाडीने मला पाठिंबा द्यावा – राजू शेट्टी

इस्लामपूर : भाजपचा खरोखरच पराभव व्हावा असे महाविकास आघाडीला वाटत असेल तर त्यांनी हातकणंगले मतदार संघात मला पाठिंबा द्यावा. मी महाविकास आघाडीत जाणार नाही. शिवसेना पक्ष पाठिंब्यासाठी सकारात्मक आहे. मात्र अजूनही राष्ट्रवादी पक्षात काही भाजपप्रेमी लोक आहेत, तेच यामध्ये अडथळे आणत आहेत, असा आरोप स्वाभिमानी पक्षाचे नेते, माजी खासदार राजू शेट्टी यांनी येथे पत्रकारांशी बोलताना केला.


बीड – महाराष्ट्र | वर्ष – ०३ | अंक–३४४ | बुधवार दि.२७ मार्च २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये


# शेती संकटात, शेतकऱ्यांवर दुहेरी संकट

पुणे । प्रतिनिधी

भारताला दुष्काळ आणि भीषण पाणीटंचाईला तोंड द्यावे लागेल, याची ठळक चिन्हे दिसत आहेत. यामुळे शेतकऱ्यांसमोरचे संकट वाढणार आणि याची चाहूल आतापासूनच लागली आहे. याशिवाय वाढत्या ऊन्हाबरोबर म्हणजेच उष्णतेबरोबर शेतीमालाच्या उत्पादनात घट होऊन महागाई वाढत जाईल. ही परिस्थितीत भविष्यात आणखी बिकट होणार आहे, असे एका अहवालात म्हटले आहे.

## देशात भयाण दुष्काळी चाहूल, केंद्रीय जल आयोगाने अहवालात मांडले भिषण वास्तव



शेतीमालाची महागाई वाढली तर शेतकऱ्यांना याचे कसे परिणाम भोगावे लागतील. पिकांचे उत्पादन कमी होऊन अन्नधान्य महागाई वाढल्यास सरकार लगेच महागाई कमी करण्यासाठी निर्णय घेते. याचा फटका शेतकऱ्यांना बसत असतो. त्यात दुष्काळ आणि महागाईच्या काळात शेतकऱ्यांना दुहेरी फटका बसत असतो. एकतर उत्पादन कमी झाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत येतात. उत्पादन कमी झाल्याने भाव वाढले तर सरकार लगेच महागाईच्या नावाखाली भाव कमी करते. यातूनही शेतकऱ्यांचे नुकसान होते. केंद्रीय जल आयोगाने आपल्या अहवालात म्हटले की, देशातील मोठी चार धरणे मार्च महिन्यात कोरडी पडली. यापैकी तीन धरणे दक्षिण भारतातील आहेत. तर १० धरणांमधील ◀◀ पान २ वर

### पहिल्यापासूनच पारा चढलेला...

२०२४ हे वर्ष सुरुवातीपासून जास्त उष्ण ठरत आहे. जानेवारी आणि फेब्रुवारीतील सरासरी तापमान जास्त होते. तर मार्च महिन्यातच बहुतांशी ठिकाणी तापमानाचा पारा ४० अशांच्या पार पोचला. याचा परिम शेतीवर होत असून उत्पादन कमी होण्याचा धोका वाढला.

## ॲड.प्रकाश आंबेडकर आज घेणार अंतिम निर्णय

### वंचित विना आघाडीचा फॉर्म्युला तयार



अकोला । प्रतिनिधी

महाविकास आघाडीसोबत जायचे का नाही यावर प्रकाश आंबडेकर आज बुधवारी निर्णय देणार आहेत. वंचितच्या राज्य कार्यकारिणीच्या कोअर टीमची बैठक घेतल्यानंतर त्यांनी ही माहिती दिली. महाविकास आघाडीसोबत जायचे की नाही यावर या बैठकीत चर्चा झाली आहे.

यासंदर्भात वंचितचे मुख्य प्रवक्ते सिद्धार्थ मोकळे यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. वंचितची पुन्हा रात्री बैठक होणार आहे. रात्रीची ही अंतिम बैठक असणार आहे. या बैठकीत महाविकास आघाडीसोबत जायचे की नाही यावर चर्चा होणार आहे, अशी माहिती त्यांनी दिली. यामुळे वंचित बहुजन आघाडी महाविकाससोबत जाणार का नाही याबाबत शंका उपस्थित केली जात आहे. तर दुसरीकडे वंचित सोबत नसली तर महाविकास आघाडीचा फॉर्म्युला ठरल्याचे सांगितंले जात आहे. लोकसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीने वंचित बहुजन आघाडी यांच्याशिवाय जागावाटपाचा फॉर्म्युला निश्चित केला आहे. शिवसेनेत यादी जाहीर करण्याची परंपरा नाही. संभाव्य उमेदवारांना काम करण्याच्या सूचना दिल्या आहेत. ◀◀ पान २ वर

# प्रकाश आंबेडकर राज्यात तिसरी आघाडी स्थापन करणार?

## महाविकास आघाडीचा डाव वंचित आघाडीमुळे बिघडणार का?

विशेष प्रतिनिधी । बीड

मराठा आरक्षण आंदोलनामुळे राज्यात महाविकास आघाडीला अनुकूल वातावरण आहे. त्यामुळे महायुतीच्या पायाखालची वाळू सरकली असून सध्या पडद्याआडून घडामोडी घडवून आणण्यासाठी अदृश्य शक्ती सक्रीय झाली असल्याची चर्चा आहे. त्यातच आटोकाट प्रयत्न करुनही वंचित आघाडी ही महाविकास आघाडी सोबत येईल, असे दिसत नाही. त्यामुळे महाविकास आघाडीचा रंगात आलेला डाव वंचितमुळे बिघडणार असल्याचे संकेत आहेत. तर दुसरीकडे प्रकाश आंबेडकर हे राज्यात लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर अप्रत्यक्षपणे मनोज जरांगे यांना सोबत घेऊन तिसरी आघाडी स्थापन करतील, असे म्हटले जात आहे. तसे झाले तर २०१९ च्या लोकसभा निवडणुकीप्रमाणे २०२४ मध्येही त्याचा थेट महायुतीला फायदा होण्याची दाट शक्यता आहे.







### मविआकडून पुन्हा ५ जागांचा प्रस्ताव

महाविकास आघाडीकडून अगोदर वंचितला ४ जागांचा प्रस्ताव देण्यात आला होता. तो प्रकाश आंबेडकरांनी फेटाळून लावल्यानंतर आता मविआकडून नव्याने ५ जागांचा प्रस्ताव देण्यात आला आहे. मात्र यातही आंबेडकर यांनी स्वारस्य दाखवले नाही.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार, शिवसेना ठाकरे गट आणि काँग्रेस हे तीन पक्ष राज्यात महाविकास आघाडीच्या माध्यमातून लोकसभा निवडणुक लढवत आहेत. २०१९ मधील लोकसभा निवडणुकीत वंचित आघाडीला सोबत न घेण्याची किमत राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेसला मोजावी लागली होती. त्यामुळे २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत वंचित आघाडी ही महाविकास आघाडीत सहभागी व्हावी यासाठी गेल्या दोन महिन्यापासून जोरदार फिल्डिंग लावण्यात आली. शरद पवार, उध्दव ठाकरे, संजय राऊत, नाना पटोले, बाळासाहेब थोरात अशा अनेक दिग्गज नेत्यांनी प्रकाश आंबेडकर यांना गळ घातली मात्र आंबेडकर अजूनही महाविकास आघाडीत आले नाहीत. वचित आघाडी ही ◀◀ पान २ वर

### २०१९ मध्ये वंचितचा असा बसला फटका

**नांदेड**–प्रताप चिखलीकर पाटील (भाजप) – ४,०८,९७७ मते, अशोक चव्हाण (काँग्रेस) –३,६७,६९४ यशपाल भिंगे (वंचित आघाडी)– १,४४,५८६ मताधिक्य – ४१,४८३, **सांगली**–संजयकाका पाटील (भाजप) – ३,४९,६२१ विशाल पाटील (स्वाभिमानी) – २,३८,३९५ गोपीचंद पडळकर (वंचित आघाडी) – १,८६,७५२ मताधिक्य – १,११,२२६, **बुलडाणा**–प्रताप जाधव (शिवसेना) – ३,६५,१५८ राजेंद्र शिंगणे (राष्ट्रवादी) – २,७२,०८२ बळीराम शिरसकर (वंचित आघाडी) – १,१९,२३६ मताधिक्य – ९३,०७६, **हातकणंगले**–धैर्यशील माने (शिवसेना) – ४,८८,८५६ राजू शेट्टी (स्वाभिमानी) ३,९४,१४६ अस्लम सय्यद – ९९,५४६ मताधिक्य– ९४,७१०, **परभणी**–संजय जाधव (शिवसेना)– ३,९०,००१ राजेश विटेकर (राष्ट्रवादी)– ३,७३,४९२ आलमगीर खान– १,११,५६१ मताधिक्य– १,११,५६१, **यवतमाळ**–भावना गवळी – ३,२५,२५१ माणिकराव ठाकरे (काँग्रेस) – २,६९,७४७७४७ प्रवीण पवार – ६४,७७६ मताधिक्य– ५५,५०४

### महायुतीचे उमेदवार ठरले, दोन दिवसात जाहिर करणार

पुणे । प्रतिनिधी

रायगड लोकसभा मतदारसंघातून सुनिल तटकरे निवडणूक लढवतील. तर शिरूरमधून शिवाजीराव आढळराव-पाटील यांची उमेदवारी जाहीर केली आहे, अशी घोषणा मंगळवारी (दि.२६) उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पत्रकार परिषदेत केली. तर २८ मार्चला बारामतीचा उमेदवार जाहीर करणार असल्याचे पवार यांनी यावेळी सांगितले.

शिवसेनेचे शिरूरचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी मंगळवारी राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेश केला आहे. त्यानंतर त्यांची शिरूरमधून उमेदवारी जाहीर केली आहे. ◀◀ पान २ वर

# ज्योतीताई मेटे बीडमध्ये तळ ठोकून; लोकसभा लढवण्याचे संकेत

## पंकजा मुंडेंचे गणित चुकणार?, तगडी फाईट होण्याची शक्यता

बीड । प्रतिनिधी

भाजपकडून पंकजा मुंडे यांची उमेदवारी जाहीर झाल्यानंतरही महाविकास आघाडीकडून उमेदवार अजून ठरला नाही. स्व. विनायक मेटे यांच्या पत्नी डॉ. ज्योती मेटे या सध्या बीडमध्ये तळ ठोकून असून त्या बीड लोकसभा लढवणार असल्याचे संकेत आहेत. शासकीय सेवेचा राजीनामा दिला असल्याचे सांगून यापुढे आपण राजकारणात सक्रीय राहणार असल्याचे ज्योती मेटे यांनी जाहीर केले. त्यामुळे पंकजा मुंडे यांचे मतांच्या बेरजेचे गणित चुकणार असल्याचे म्हटले जात आहे.



### बीड का खासदार कैसा हो.. ज्योतीताई जैसा हो..!

विनायक मेटे यांच्या समाधी स्थळी ज्योती मेटे या दर्शनासाठी गेल्या होत्या. त्यावेळी कार्यकर्त्यांनी बीड का खासदार कैसा हो..ज्योतीताई जैसा हो..! या घोषणा दिल्या. त्यामुळे मेटे या बीड लोकसभा लढवणार असल्याचे संकेत आहेत.

### गाठीभेटीला केली सुरुवात

ज्योतीताई मेटे या दोन ते तीन दिवस बीडमध्ये आहेत. कोणत्याही परिस्थितीमध्ये बीड लोकसभा निवडणूक लढवायची असा निर्णय कार्यकर्त्यांनी घेतला आहे. त्यानुसार मेटे या कामाला लागले असून बीड मतदार संघामध्ये त्यांनी मंगळवारी दुपारनंतर मतदारांच्या गाठीभेटीस सुरुवात केली आहे. आणखी दोन दिवस त्या पूर्ण मतदारसंघात फिरून मतदार व कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी घेणार आहेत.

पंकजा मुंडे यांच्या विरोधात बीडमध्ये महाविकास आघाडीच्या माध्यमातून तगडा उमेदवार देण्यासाठी शरद पवार यांनी बरीच चाचपणी केली. बजरंग सोनवणे यांनी पवारांच्या पक्षात प्रवेश केला. तसेच शिवसंग्रामच्या नेत्या ज्योतीताई मेटे यांनीही शरद पवार यांची पुणे येथे दोन वेळा भेट घेतली आहे. पक्ष आणि चिन्हामुळे उमेदवारीबाबत काहीच निश्चित होऊ शकले नाही. त्यातच मेटे यांना देवेंद्र फडणवीस यांचा फोन आल्याने त्या महायुतीतच राहतील, असे म्हटले जात होते. मात्र पुन्हा एकदा मेटे या बीड लोकसभा निवडणुक लढवण्यास इच्छुक असल्याचे दिसून आले. मंगळवारी त्या बीडमध्ये आल्या. सर्वप्रथम त्यांनी विनायक मेटे यांच्या समाधीस्थळी जाऊन दर्शन घेतले. यावेळी शिवसंग्रामच्या कार्यकर्त्यांनी ◀◀ पान २ वर

# दिगांबर जिनिंग प्रेसिंगच्या नावाखाली शेतकऱ्यांची जमिन लाटली

### शासनाचीही फसवणूक, धारूर तहसिलदारांकडे संदिपान थोरातांची तक्रार

बीड। प्रतिनिधी

दिगांबर जिनींग प्रेसिंगच्या नावाखाली आवरगाव (ता. धारूर) दादासाहेब ज्ञानोबा जगताप यांची जमीन लाटली असल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते संदिपान थोरात यांनी धारूर तहसिलदारांकडे केलेली आहे. तक्रार करून दोन वर्ष उलटून गेली तरी अद्याप धारूर प्रशासनाने यात ठोस अशी कारवाई केलेली नाही, त्यामुळे फसवणूक झालेल्या शेतकर्याच्या वारसास जमिन परत करून देण्यासाठी श्री. थोरात आता जिल्हाधिकार्यांकडे दाद मागणार आहेत.

श्री. थोरात यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे, की धारूर येथील श्रीकृष्ण दिगांबर चिद्रवार यांनी आवरगाव (ता.धारूर) येथील गट नंबर १५० सह इतर एका गटातील जमीनीचा मुळ मालक दादासाहेब ज्ञानोबा जगताप (रा. आवरगाव) यांच्या जाती मालकीची व कब्जातील ७९ आर जमीन ही श्रीकृष्ण दिगांबर चिद्रवार यांनी दिगांबर जिनिंग प्रेसिंग संस्थेसाठी विना मोबदला मुळ मालकास सदरचे संस्थेमध्ये सभासद करण्याच्या आमिषाने खरेदीखत करून घेतली, त्यानंतर श्रीकृष्ण चिद्रवार यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती धारूर यांच्याकडे जिनींग व प्रेसिंग संस्था चालविण्यासाठी लायसन्सची मागणी केली, परंतू जिनिंग व प्रेसिंगचे लायसन्स न घेतल्यामुळे कृषी उत्पन्न बाजार समिती धारूर यांनी दि. ३१ मार्च २००० रोजी श्रीकृष्ण चिद्रवार यांनी दिगांबर जिनिंग प्रेसिंग संस्था आवरगाव यांच्या नावाने कोणतेही लायसन्सचे नुतनीकरण करून घेतलेले नाही, तसेच दिगांबर जिनिंग प्रेसिंग संस्था चालविण्यासाठी वरील खरेदी केलेल्या जमीनीमध्ये कोणतेही बांधकाम केले नाही अथवा मशिनरी उभा केलेली नाही, ज्या उद्देशासाठी चिद्रवार यांनी जमीन खरेदी केली होती तो उद्देश साध्य केला नाही. त्यामुळे चिद्रवार यांनी दिगांबर जिनिंग प्रेसिंग संस्था आवरगाव या नावाने चुक, खोटे व बनावट कागदपत्र तयार करून केवळ जमीन हाडप करण्याच्या उद्देशाने शासनाची व मालकाची फसवणूक केलेली आहे. जमीनीचे मुळ मालक दादासाहेब जगताप हे मयत झालेले आहेत. त्यामुळे चिद्रवार हे मुळ मालकास फसवून घेतलेली जमीन इतर दुसर्यांना विक्री करण्याचा प्रयत्न करीत आहेत. ज्या उद्देशासाठी चिद्रवार यांनी जमीन खरेदी केली होती तो उद्देश साध्य न केल्यामुळे व खरेदी केलेल्या जमीनीवर कोणतेही बांधकाम अथवा मशिनरी उभी न केल्यामुळे शासनाच्या आदेशाचा, अटीचा व कराराचा भंग केलेला आहे. चिद्रवार यांनी ज्या उद्देशासाठी जमीन खरेदी केली होत तो उद्देश साध्य न केल्यामुळे कायदेशीर नियमानुसार ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२६ मार्च २०२३

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : १४.०० क्विंटल | २,१९० | ३,३४० | २,६८२ |
| ज्वारी/हायब्रिड :१८५.५० क्विंटल | १,६४१ | ३,१५० | २,४७४ |
| मूग : ०.५० क्विंटल | ९,३०० | ९,३०० | ९,३०० |
| तूर :९.५० क्विंटल | ८,७०० | ९,४८१ | ९,१३६ |
| उडीद : २.०० क्विंटल | ७,३०० | ९,६०१ | ८,९७५ |
| बाजरी: १७.०० क्विंटल | २,३०० | २,७६० | २,६३० |
| चिंचोका/लोकल: ३.०० क्विंटल | २,००० | २,००० | २,००० |
| सोयाबीन: ८०.०० क्विंटल | ४,४०० | ४,५११ | ४,४५६ |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ५,४०० | ५,४३१ | ५,४१५ |

# रुग्णालये, मोहल्ला क्लिनिकमध्ये मोफत औषधे द्या

## मुख्यमंत्री केजरीवाल यांचा कोठडीतून आदेश जारी

नवी दिल्ली । वृतसंस्था

अबकारी कर गैरव्यवहार प्रकरणात गंभीर आरोप झाल्यानंतर ईडीच्या कोठडीत असलेले दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी मंगळवारी कोठडीतून दुसरा आदेश जारी केला. त्यांनी दिल्लीचे आरोग्य मंत्री सौरभ भारद्वाज यांना रुग्णालये आणि मोहल्ला क्लिनिकमध्ये मोफत औषधे मिळत राहतील आणि त्यांच्या वैद्यकीय चाचण्या सुरळीतपणे केल्या जातील



याची खात्री करण्यास सांगितले. स्वत: सौरभ भारद्वाज यांनी याबाबत माहिती दिली. ते म्हणाले की, मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना ईडीच्या कोठडीत असतानाही सामान्यांच्या अडचणी वाढू नयेत, असे वाटत आहे.

अटकेत असताना दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी जारी केलेल्या सरकारी आदेशाची ईडीने दखल घेतली आहे. ईडीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, कोठडीत असताना मुख्यमंत्र्यांनी अशा सूचना जारी करणे हे पीएमएलए न्यायालयाच्या आदेशाच्या कक्षेत येते का याचा तपास केंद्रीय एजन्सी करत आहे. अरविंद केजरीवाल कोठडीत असताना ◀◀ पान २ वर

# अखेर विजय शिवतारेंवर शिवसेनेकडून कारवाई !

## शिस्तभंगाची नोटीस धाडणार

मुंबई । प्रतिनिधी

बारामती लोकसभा मतदारसंघात पवार घराण्याविरोधात दंड थोपटून उभे राहिलेले विजय शिवतारे हे कोणत्याही परिस्थितीत माघार घ्यायला तयार नाहीत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही विजय शिवतारे यांना आपल्याला युतीधर्म पाळला पाहिजे, असा सल्ला दिला होता. मात्र, बारामती ही मला नियतीने दिलेली असाईनमेंट आहे, असे सांगत विजय शिवतारे यांनी अजित पवार यांच्याविरोधात उपसलेली तलवार म्यान करण्यास नकार दिला होता. त्यामुळे आता निर्वाणीचा उपाय म्हणून शिंदे गटाकडून विजय शिवतारे यांना पक्षातून बाहेरचा रस्ता दाखवला जाण्याची शक्यता आहे.

### अद्याप नोटीस आली नाही – विजय शिवतारे

विजय शिवतारे यांना शिवसेनेकडून त्यांच्याविरुद्ध होणाऱ्या संभाव्य शिस्तभंगाच्या कारवाईबाबत विचारण्यात आले. तेव्हा शिवतारे यांनी म्हटले की, मला पक्षाकडून अद्याप कोणतीही नोटीस आलेली नाही. मी बुधवारी खडकवासला मतदारसंघाचा दौरा करणार आहे. मी बारामतीमधून लोकसभा निवडणूक लढण्यावर ठाम आहे, असे शिवतारे यांनी सांगितले. मात्र, आता शिवसेनेने त्यांना पक्षातून काढून टाकल्यानंतर विजय शिवतारे पुढे काय करणार, हेदेखील येणाऱ्या काळात पाहावे लागेल.

सुत्रांच्या माहितीनुसार, शिवसेनेकडून विजय शिवतारे यांना लवकरच पक्षाच्या शिस्तीचा भंग केल्याप्रकरणी नोटीस पाठवली जाईल. यानंतरही विजय शिवतारे यांनी पक्षादेश मानला नाही तर त्यांना शिवसेनेकडून निरोपाचा नारळ दिला जाईल, असे सांगितले जात आहे. विजय शिवतारे यांनी अजित पवार यांच्याविरोधात दंड थोपटल्यानंतर ◀◀ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# करिअर च्या नादात आनंद गमावू नका

तब्बल २८ लाख विद्यार्थ्यांना नीट परीक्षेचे वेध लागले आहेत. वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमासाठीची ही प्रवेश परीक्षा आहे. जी देशपातळीवर घेतली जाते. विद्यार्थ्यांची आतापर्यंतची ही विक्रमी संख्या मानली जाते. गतवर्षीच्या तुलनेत विद्यार्थ्यांची संख्या यंदा सुमारे सात लाखांनी वाढली आहे. मुले इयत्ता बारावीत गेली की त्यांच्या पालकांना त्यांच्या करिअरची दिशा ठरवण्याचे वेध लागतात. मुलांनी चांगले शिक्षण घ्यावे आणि त्याआधारे त्यांचे भवितव्य मार्गी लागावे हाच पालकांचा त्यामागचा उद्देश असतो. तथापि त्यासाठी मुलांच्या मनाचा कल हा महत्त्वाचा घटक आहे. कल ओळखणे किंवा तो माहीत करून घ्यायची किती पालकांची तयारी असते?

२८ लाख विद्यार्थ्यांची डॉक्टर होण्याची क्षमता असू शकेल का? त्यांना स्वतःला डॉक्टर होण्याची इच्छा आहे की ते त्यांच्या पालकांचे स्वप्न असावे? देशात ७०६ वैद्यकीय महाविद्यालये आणि त्यात सुमारे एक लाख दहा हजार जागा असल्याचे सांगितले जाते. त्याव्यतिरिक्त दंत, आयर्वेद, युनानी अशा इतर वैद्यकीय क्षेत्रांच्या जागा असतील. पण त्या नक्कीच २८ लाख नसतील. म्हणजेच परीक्षेचा निकाल लागल्यानंतर लाखो विद्यार्थ्यांचा स्वप्नभंग होऊ शकेल. तो पेलण्याची क्षमता सगळ्याच विद्यार्थ्यांमध्ये असू शकेल असे नाही. त्यांचे तथाकथित अपयश त्यांच्या पालकांना तरी समजावून घेता येणार आहे का? मुळात करिअर ही संकल्पना किती पालकांना नीटशी माहीत असेल याबाबत शंका आहे. मुलांनी चांगले शिक्षण घेऊन चांगली नोकरी मिळवून बक्कळ पगार कमवावा ही बहुसंख्य पालकांची करिअरची ढोबळ व्याख्या असू शकेल. तथापि करिअर हा त्यांच्या आयुष्याचा एक भाग आहे. ते त्यांचे सर्वस्व नव्हे, हे पालकांनी लक्षात घेण्याची गरज आहे. मुलांनी एखादे क्षेत्र निवडून त्यात यश मिळवणे. चांगल्या मागनि अर्थार्जन होणे. त्यातून त्यांना समाधान, आनंद आणि आदर प्राप्त होणे अशी करिअरची व्यापक संकल्पना मानसतज्ज्ञ सांगतात. मुलांनी त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात करिअर केल्यास ते अर्थार्जन तर करू शकतीलच पण त्यांना त्यातून आनंद आणि समाधानाचीदेखील प्राप्ती होऊ शकेल. सांगा कसे जगायचे, गाणे म्हणत की कण्हत, असा प्रश्न विचारून कविवर्य मंगेश पाडगावकर त्याचे उत्तरही त्यांच्या कवितेत देतात.

करिअर करताना मुलांची आवड जपली गेली तर आयुष्य गाणे म्हणत जगण्याचा मार्ग त्यांना आपोआप गवसू शकेल. त्यासाठी त्यांच्या मनाचा कल जाणून घेण्याचे वैज्ञानिक मार्ग उपलब्ध आहेत. त्यांच्या आधारे मुलांना त्यांची आवड जाणून घेण्यास पालक मदत करू शकतात. सरकारी पातळीवरदेखील कलचाचणी घेतली जाते. करिअर निवडण्यासाठी ही चाचणी मदत करू शकते. मुलांच्या अंगीभूत नैसर्गिक क्षमतांचा शोध या चाचणीतून घेतला जाऊ शकतो. तथापि त्यासाठी योग्य व्यक्ती किंवा केंद्रांची निवड करणे हे पालकांचे कौशल्य आहे. आजार छोटा असो अथवा दीर्घ डॉक्टरची निवड करताना माणसे दहावेळा विचार करताना आढळतात. डॉक्टरांचा अनुभव जाणून घेण्याचा प्रयत्न करतात. कारण चौकसपणा हे मानवी स्वभावाचे वैशिष्ट्य आहे. कल चाचणीसाठी निवड करताना हाच चौकसपणा पालकांनी दाखविला तर करिअर चे बरेचसे प्रश्न सहज सुटतील.

# परळी मार्गे धावणाऱ्या विशेष रेल्वेला मुदतवाढ




**परळी । प्रतिनिधी**

दक्षिण मध्य रेल्वेमार्फत चालविण्यात येत असलेल्या चार विशेष रेल्वेगाड्याना मुदत वाढ देण्यात आली असून या चार ही रेल्वे गाड्या परळीमार्गे धावणार आहेत.उन्हाळी सुट्टीच्या पार्श्वभूमीवर दक्षिण मध्ये रेल्वे विभागाने घेतलेल्या या निर्णयामुळे प्रवाशांची गैरसोय दूर होणार आहे. दक्षिण मध्य नांदेड रेल्वे विभागात धावत असलेल्या विशेष गाड्यांना मुदत वाढ देण्यात आली आहे.उन्हाळा सुट्टी दरम्यान होणारी प्रवाशांची गर्दी लक्षात घेवून दक्षिण मध्य रेल्वे चालवीत असलेल्या विशेष गाड्यांना मुदत वाढ देण्यात आलेली आहे. यामध्ये परळी रेल्वे स्थानकावरून दर रविवारी धावणारी गाडी क्रमांक ०६७३७ तिरुपती-साईनगर शिर्डी ही गाडी ३० जून २४ पर्यंत, दर सोमवारी धावणारी गाडी क्रमांक ०६७३८ साईनगर शिर्डी-तिरुपती ही गाडी १ जुलै २४ पर्यंत, दर सोमवारी धावणारी गाडी क्रमांक ०७६०९ पूर्णा-तिरूपती ही गाडी २४ जून पर्यंत तर दर मंगळवारी धावणारी गाडी क्रमांक ०७६१० तिरुपती-पूर्णा ही गाडी २५ जून पर्यंत मुदतवाढ दिल्याने धावणार आहे.या विशेष गाड्यांना मिळालेल्या मुदतवाढीचा लाभ घेऊन प्रवास करण्यासाठी प्रवाशांनी आपल्या जवळील रेल्वे स्थानकाशी संपर्क साधून वेळापत्रक, आरक्षण आदींची चौकशी करावी असे रेल्वे विभागाकडून कळविण्यात आले आहे.

# ड्राय डे च्या दिवशी दोन अवैध दारू विक्रेत्यांवरती धाड
## २१७४० रुपयाचा देशी विदेशी दारूचा मुद्देमाल जप्त

**तांदळा । प्रतिनिधी**

चकलांबा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी नारायण एक शिंगे हे स्टाफ सह पोलीस स्टेशन हद्दीमध्ये पेट्रोलिंग करत असताना त्यांना गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, राक्षस भवन फाटा ते राक्षस भवन जाणाऱ्या रस्त्यावरती एक इसम एका पत्रा शेडमध्ये देसी व विदेशी दारू विकत आहे तसेच कोळगाव ते तांदळा रोड वरती सार्थक बियर शॉपीच्या पाठीमागील बाजूस एक इसम दारूची अवैध विक्री करत आहे. त्याप्रमाणे सापळा रचून दोन्ही ठिकाणी वेगवेगळ्या वेळी धाड टाकली असता दोन्ही ठिकाणी बातमी प्रमाणे २१७४० रुपये किमतीचा मुद्देमाल मिळाला असून तो जागीच जप्त करून आरोपीं १) संदिपान सिताराम शेंबडे वय ३८ वर्ष राहणार तांदळा तालुका गेवराई २) राजेंद्र उर्फ नाना नाटकर राक्षसभवन तालुका गेवराई यास ताब्यात



घेऊन कायदेशीर कारवाई करून दारूबंदी कायदा कलम ६५( इ) प्रमाणे कायदेशीर पोलीस ठाणे चकलांबा येथे गुन्हा दाखल केलेला आहे. सदर कारवाई ही माननीय पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर साहेब अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर साहेब, पोलीस उपाधीक्षक नीरज राजगुरू साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी नारायण एकशिंगे, पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर इंगळे, प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक कुमावत., पोलीस कॉन्स्टेबल खटाणे चालक हवालदार जमादार यांनी केली आहे.

# स्व.प्रवीण सोनवणे यांच्या कुटुंबीयांचे डॉ.ज्योतिताई मेटे यांच्याकडून सांत्वन

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

**ना कुठे गाजावाजा ना कुठे सत्कार, ना कुठे हारतुरे स्विकारत किंवा कोणत्याही प्रकारचा बडेजावपणा न करता आज डॉ.ज्योतिताई विनायकराव मेटे यांनी थेट मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून आत्मबलिदान दिलेल्या कुटुंबाच्या घरी भेट देऊन सांत्वन केले.**



मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मागील अनेक दिवसांपासून लढ्यात सहभागी असलेल्या उच्च शिक्षित प्रविणने बेरोजगारीला कंटाळून व उच्च शिक्षण पूर्ण करून सुद्धा कोणत्याही प्रकारची नोकरी मिळाली नाही तसेच शासकीय स्तरावर आपली कुणबीची नोंद न सापडल्याने व सगेसोयरे ची अंमलबजावणी होत नसल्याने आपल्याला आरक्षण मिळनार नाही या नैराश्यातुन दि.१७ रविवारी पहाटेच्या सुमारास आपल्या व्हॉटसपवर मराठा आरक्षण संदर्भात स्टेटस ठेऊन गळफास घेऊन आत्मबलिदान देऊन जीवन संपविल्याची घटना नुकतीच घडली होती. प्रवीण दिलीप सोनवणे असे आत्महत्या केलेल्या तरूणाचे नाव आहे. या विषयी सविस्तर माहिती अशी,आष्टी तालुक्यातील शेरी बुद्रुक (कडा) ता.आष्टी येथील तरूण प्रवीण दिलीप सोनवणे हा उच्च शिक्षित तरुणांने मराठा समाजाला आरक्षण मिळत नसल्याने नैराश्यातुन आत्मबलिदान दिले होते, प्रवीण हा नेहमी मराठा आंदोलक मनोज जरांगे याच्या समर्थनार्थ राज्यातील विविध भागात अनेक ठिकाणी उपस्थित होत असे. मराठा समाजाने एवढा मोठा लढा उभारून देखील आपल्या समाजाला आरक्षण मिळत नसल्याने त्याने रविवारी मोबाईलवर एक मराठा लाख मराठा व आरक्षण संदर्भात स्टेटस ठेऊन गळफास घेऊन जिवनयात्रा संपविल्याची दुर्दैवी घटना घडली होती ह्याची माहीती कळताच डॉ.ज्योतिताई विनायकराव मेटे यांनी आत्महत्या ग्रस्त कुटुंबास भेट देऊन सांत्वन केले व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करत असताना काही अडचण आल्यास मला सांगा असे शेवटी डॉ.ज्योतिताई मेटे यांनी सांगितले.

# अज्ञात माथेफिरूने कडब्याची गंज पेटवली

## दुष्काळात घोड्यांना काय खाऊ घालावे सय्यद कुटुंब चिंतेत



### वर्षाभरापूर्वी दोन घोड्यांचा संशयास्पद मृत्यू

इसाक सय्यद आणि शाहरुख सय्यद हे बापलेक गेल्या दहा-बारा घोडे नाचवण्याचा व्यवसाय करून आपले कुटुंब चालवत आले आहे. या कुटुंबा वारंवार संकट येत असून अगदी वर्षभरा ज्या घोड्याच्या जीवावरती आपले उदरनिर्वाह चालवीत होते. त्याच घोड्याचा एक वर्षांपूर्वी आठ दिवसाच्या फरकाने संशयास्पद दुर्दैवी मृत्यू झाला यामुळे सहाजिक सय्यद कुटुंबावरती उपासमारीची वेळ आली. मात्र बापलेकाने आपले कंबर कसून स्वतःच्या बळावर पुन्हा दोन घोडे उभा केले. या घोड्यांच्याकर्जा दबलेले असतांना अज्ञात माथफिरूने त्यांची कडब्याची गंज पेटवून दिली आहे .

**शिरूर । शंकर भालेकर**

**दुष्काळामध्ये घोड्यांना चारा खावू घालता यावा यासाठी शेतामध्ये राब राब राबून गोळा केलेला कडबा अज्ञात माथे फिरुने पेटवून दिल्याची घटना शुक्रवार दि.२२ मार्च रोजी मध्यरात्री फुलसांगवी मध्ये घडली आहे. यामुळे नवरदेवाच्या वरातीमध्ये घोडे नाचवून आपला उदरनिर्वाह भागवणाऱ्या सय्यद कुटुंबाच्या घोड्यावरतीच आता उपासमारीची वेळ आल्याने दावणीच्या घोड्यांना आता काय खाऊ घालावे या चिंतेने सय्यद कुटुंब चिंतातुर झाले आहे.**

शिरूर कासार तालुक्यातील मौजे फुलसांगवी येथील रहिवासी असलेले इस्साक सुलेमान सय्यद हे आपल्या दावणीला घोडे सांभाळत असून, या घोड्याचे वरातीमध्ये, नवरदेवपरण्या पुढे नृत्य दाखवून, नवरदेवाची घोड्यावर मिरवणूक काढून मिळालेल्या कमाई मधून आपला उदरनिर्वाह करत आहेत.आर्थिक परिस्थिती दुर्बलतेची असूनही त्या घोड्यांना संभाळणे हे त्यांच्यासाठी प्रयत्नाची पराकाष्टा करणारे काम आहे. यावर्षी तालुक्यामध्ये सर्वत्र दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने या घोड्यांना चारा मिळवणे या परिवारासाठी जिकरीचे झाले होते म्हणून इसाक सय्यद यांचे कुटुंब गेल्या काही दिवसापासून उन्हातान्हाची तमा न करता या घोड्यांना वैरण मिळवण्यासाठी घरच्या आणि दुसऱ्याच्या शेतामध्ये राबवत होते. आपल्या कष्टातून त्यांनी सुमारे १००० ते ११०० त्यांनी कडवा गोळा करून घराच्या पाठीमागे गंज लावून ठेवली होती. ही गंज शुक्रवार दि.२२ मार्च रोजी मध्यरात्री १२ ते १२:३० च्या दरम्यान अज्ञात व्यक्तीने पेटून दिली.यामध्ये जवळपास सर्वच कडबा जळून खाक झाला आहे. आजच्या बाजार भावामध्ये कडब्याची किंमत २५ ते ३० हजार रुपये एवढी जरी असली तरी, आता कडबा घेण्यासाठी पैसा कोठून उपलब्ध करावा, पैसा उपलब्ध केला तरी चारा कोठून आणावा. दुष्काळामध्ये दावणीच्या या जनावरांना आता काय खाऊ घालावे हा प्रश्न सय्यद परिवारावर येऊन पडला आहे. मुक्या प्राण्यांच्या मुखातला चारा पेटवून देऊन केलेल्या दुष्कृत्य केलेल्या अज्ञात माथेफिरूच्या विरोधात फुलसांगवी परिसरातून तीव्? संताप केला जात आहे.

# बाथरूममध्ये विजेचा धक्का बसून तरूणाचा मृत्यू

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा गावांमध्ये अंघोळ करून बाहेर येताना बाथरूमजवळ असलेल्या विद्युत वायरला हात लागून विजेचा धक्का बसून तरुण ठार झाला. ही घटना आज (दि.२५) सकाळी साडेसातच्या सुमारास घडली. महेश दादासाहेब तोरडमल (वय २६) असे मृत तरुणाचे नाव आहे. त्यांच्या मागे पत्नी मोहिनी, मुलगी, वृद्ध आई-वडील असा परिवार आहे. या घटनेमुळे सुलेमान देवळा व पंचक्रोशीत हळहळ व्यक्त होत आहे.



# बायनाबाई उनवणे यांचे निधन

**माजलगांव । प्रतिनिधी**

**शहरापासुन जवळच असलेल्या ब्रम्हगाव येथील रहिवाशी असलेल्या बायनाबाई भगवानराव उनवणे वय ७३ वर्षे अल्पशा आजाराने दि. २५ सोमवारी निधन झाले.**

त्यांच्या पार्थीवावर मंगलनाथ स्मशानभुमीत दि. २६मंगळवारी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी डॉक्टर, वकील, पत्रकार, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. भाजपाचे नेते सत्यनारायण उनवणे, गोकुळ, विष्णु भगवान उनवणे यांच्या त्या आई होते.



पान १ वरून...

### शेती संकटात, शेतकऱ्यांवर

पाणीसाठा चिंताजनक स्थितीत पोहचला आहे. आंध्र प्रदेशातील पाणीसाठा केवळ ३१ टक्क्यांवर आला. तर एक मोठे धरण कोरडे पडले. कर्नाटक आणि तमिळनाडूतील परिस्थितीही बिकट आहे. महाराष्ट्रातील धरणांमधील जिवंत पाणीसाठी सरासरीपेक्षा १२ टक्क्यांनी कमी आहे, असेही केंद्रीय जल आयोगाने स्पष्ट केले आहे. पॉट्सडॅम इंस्टीट्यूट फॉर क्लायमॅट इम्पॅक्ट रिसर्च आणि युरोपियन सेंट्रल बँक या संस्थांनी एक रिसर्च स्टडी प्रसिध्द केला असून, त्यात त्यांनी भविष्यात वाढत्या उष्णतेचे शेती आणि अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होणार असल्याचे स्पष्ट केले. वाढत्या उष्णतेमुळे दुष्काळ आणि जास्त पाऊस अशा घटना वाढत जाणार आहे. याचा सर्वाधिक परिणाम शेतीवर होणार असून उत्पादन घटत जाईल. अर्थव्यवस्थेच्या सर्वच बाजूंवर याचा परिणाम दिसेल. तसेच अन्नधान्य महागाई २०२५ पर्यंत ३.२ टक्क्यांनी वाढेल. तसेच एकूण मगाहाई १.१८ टक्क्यांनी वाढू शकते, असा अंदाज या रिसर्च रिपोर्टमध्ये देण्यात आला. ज्या वर्षात जास्त उष्णता किंवा दुष्काळ पडला त्या वर्षात अन्नधान्य महागाई वाढल्याचा आजवरचा अनुभव आहे, असेही या अहवालात म्हटले आहे. यंदा आशियासह इतर काही देशांमध्ये पाऊस कमी पडला. याचा परिणाम शेतीवर स्पष्ट दिसून येत आहे. भारतातही यंदा कमी पाऊस झाला.

----------

### प्रकाश आंबेडकर राज्यात तिसरी

महाविकास आघाडीत येऊ नये यासाठी राज्यात अदृश्य शक्ती सक्रीय झाली असल्याचेही दिसते. देवेंद्र फडणवीस यांची सध्याची कार्यशैली पाहिली तर तेच डावप्रतिडाव टाकत असल्याचे दिसत आहे. महाविकास आघाडीने वंचितला अगोदर ४ जागा तर त्यानंतर दि. २६ मार्च रोजी ५ जागा देण्याचा शेवटचा प्रस्ताव दिला आहे. मात्र हा प्रस्ताव आंबेडकर मान्य करतील असे दिसत नाही. कारण सागर बंगल्याला हा प्रस्ताव दिसला असेलच. त्यामुळे प्रकाश आंबेडकर हे राज्यात लोकसभा निवडणुक स्वतंत्ररित्या वंचितच्या माध्यमातून लढतील असे दिसते. तसेच त्यांच्या समोर दुसरा आणखी एक पर्याय आहे. तो म्हणजे राज्यात तिसरी आघाडी स्थापन करुन लोकसभा निवडणुकीला सामोरे जाणे. हा पर्याय आंबेडकर निवडतील, असे म्हटले जात असून त्या दृष्टीने पाऊले टाकल्याची चर्चा आहे. तिसऱ्या आघाडीत मनोज जरांगे व मराठा समाज, धनगर समाज, बच्चु कडू, राजू शेट्टी, ओवेसींची एमआयएम आणि आम आदमी पार्टीला घेण्याचा प्रयत्न केला जावू शकतो. तसे झाले तर राज्यात सध्या मराठा आरक्षण आंदोलनामुळे ओबीसी विरुध्द मराठा जो वाद निर्माण झाला. त्यामुळे मराठा समाजासह ओबीसी सुध्दा महायुती व महाविकास आघाडीवर नाराज आहे. अशा नाराज मतदारांना राज्यात तिसरा पर्याय मिळू शकतो. त्यातून लोकसभा निवडणुकीत तिसऱ्या आघाडीला ८ ते १० खासदार निवडून आणणे सहज शक्य होईल. तसेच तिसऱ्या आघाडीचा महायुतीलाच थेट फायदा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. २०१९ प्रमाणे महाविकास आघाडीसाठी पुन्हा वंचित कर्दनकाळ ठरु शकते, असे दिसत आहे.

-----------

### ॲड.प्रकाश आंबेडकर

मविआत असल्यामुळे यादी जाहीर करू, असे ठाकरे गटाचे खासदार आणि नेते संजय राऊत म्हणाले. उद्धव ठाकरे यांनी सर्व उमेदवार निश्चित केले आहेत. कॉंग्रेस आणि राष्ट्रवादीचीही तयारी झाली आहे. एकाही जागेवरून संघर्ष, तणाव नाही, असेही ते म्हणाले.

**लाचारी मान्य करणार नाही - ॲड. प्रकाश आंबेडकर**

ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे की, माझ्या आजोबांनी चालवलेली चळवळ लाचारीच्या विरोधात होती. त्यामुळे मी पण या ठिकाणी लाचारी मान्य करणार नाही. युतीमध्ये अडचण येऊ नये म्हणून व्यक्तीगत वाद किंवा हेवेदावे येऊ दिले नाही. पण, जिथे चळवळीलाच लाचार केले जाते, संपवले जाते. त्या ठिकाणी आम्ही हे मान्य करणार नाही. वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते तसेच हितचिंतकांनी युतीच्या संदर्भात काय केले पाहिजे, याविषयी सल्ला दिला. त्यामुळे त्यांचा मन:पूर्वक आभारी असल्याची भावना वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी एक्स हॅंडलवर व्हीडिओ पोस्ट करुन व्यक्त केली. अकोला येथे वंचित बहुजन आघाडीने महाविकास आघाडीत सहभागी व्हावे किंवा नाही याबाबत अंतिम भूमिका जाहिर करण्यासाठी फुले-शाहु-आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांकडून मते जाणून घेतली. त्यानंतर प्रकाश आंबेडकर यांनी एक्स या ट्विटर हॅडलरून वंचित बहुजन आघाडीची भूमिका स्पष्ट केली.

-------------

### महायुतीचे उमेदवार ठरले,

त्यांचा सामना राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांच्याशी होणार आहे. पवार पुढे म्हणाले की, लोकसभा निवडणुकीच्या जागा वाटपावरून महायुतीत कोणतेही मतभेद नाहीत. जागा वाटपांचे काम ९९ टक्के पूर्ण झाले आहे. तिन्ही पक्षांतील कार्यकर्त्यांचे समाधान होईल, असे लोकसभेसाठी जागांचे वाटप करण्यात आले आहे. नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी आम्ही एकजुटीने काम करत आहोत. महायुतीच्या स्टार प्रचारकांची यादीही तयार करण्यात आली आहे. सातारा लोकसभा मतदारसंघ राष्ट्रवादी अजित पवार गट लढविणार आहे. भाजपचे नेते खासदार उदयनराजे यांची समजूत काढत आहेत, असेही पवार म्हणाले. महायुतीत सहभागी झालेले रासप नेते महादेव जानकर बारामतीमधून निवडणूक लढविणार असल्याचे बोलले जात आहे. यावर राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी ही केवळ कपोलकल्पित चर्चा आहे. नुसती अफवा आहे, असे स्पष्ट केले.

------------

### ज्योतीताई मेटे बीडमध्ये तळ

जोरदार घोषणाबाजी केली. त्यानंतर मेटे यांनी शिवसंग्राम भवन येथे माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या, मी शासकीय सेवेचा राजीनामा दिला असून यापुढे मी पुर्णवेळ राजकारणात सक्रीय राहणार आहे, असे सांगितले. त्यामुळे त्या बीड लोकसभा लढवण्यासाठी इच्छुक असल्याचे दिसत होते. तसे झाले तर पंकजा मुंडे यांना ज्योती मेटे यांच्या रुपाते तगडे आव्हान दिले जाण्याची शक्यता आहे. तसेच पंकजा मुंडे यांचे मतदारसंघातील मतांच्या बेरजेचे गणित चुकणार असल्याचे दिसते.

----------

### दिगांबर जिनिंग प्रेसिंगच्या नावाखाली

मुळ मालकास सदर जमीन परत मागण्याचा अथवा शासनास जमीन परत देण्याचा कायदेशीर अधिकार आहे. त्यामुळे आपण चिद्रवार यांनी दिगांबर जिनिंग प्रेसिंग संस्था आवरगावसाठी खरेदी केलेल्या जमीनीवर कोणतेही बांधकाम अथवा मशिनरी उभी न केल्यामुळे त्यांनी खरेदी केलेली जमीन मुळ मालकास परत देण्याचा आदेश करावा, त्याबरोबरच श्रीकृष्ण चिद्रवार यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी पांगरी येथील सामाजिक कार्यकर्ते संदिपान आप्पाराव थोरात यांनी धारूर तहसिलदारांकडे केलेली आहे. मात्र त्यांच्या या मागणीवर तहसिल प्रशासनाकडून अद्याप कोणताच निर्णय झालेला नाही, त्यामुळे आता श्री. थोरात हे जिल्हाधिकार्यांकडे दाद मागणार आहेत.

-------------

### अखेर विजय शिवतारेंवर

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वत: विजय शिवतारे यांची मनधरणी केली होती. त्यानंतरही शिवतारे आपल्या भूमिकेवर ठाम राहिले होते. शिवतारे यांच्या या भूमिकेमुळे महायुतीत तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. महायुती अस्तित्त्वात आली तेव्हा एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी आपापल्या कार्यकर्त्यांना स्थानिक पातळीवर एकमेकांशी जुळवून घेण्याच्या सूचना दिल्या होत्या. परंतु, आता शिवतारे यांच्या आक्रमक वक्तव्यांमुळे महायुतीमध्ये मिठाचा खडा पडू शकतो. ही बाब लक्षात घेऊन एकनाथ शिंदे आणि शिवसेनेच्या वरिष्ठ नेत्यांनी विजय शिवतारे यांच्यावर अखेर कारवाईचा बडगा उगारण्याचे ठरवल्याचे सांगितले जात आहे.

-------------

### रुग्णालये, मोहल्ला क्लिनिकमध्ये मोफत

महत्त्वाच्या सरकारी कागदपत्रांवर स्वाक्षरी करू शकतात का? ते तुरुंगात असल्याने त्यांना जेल मॅन्युअल पाळावे लागतील. तुरुंगात त्यांना पेन किंवा कागद देता येणार नाही. न्यायालयाच्या आदेशानुसार, ते दररोज संध्याकाळी ६ ते ७ दरम्यान अर्धा तास पत्नी आणि स्वीय सहाय्यकाला भेटू शकतात, तर अर्धा तास त्याच्या वकिलांना भेटू शकतात.

----------

cmyk

# जेथलिया हॉस्पिटलच्या उदघाटनास उपस्थित रहावे -डॉ.जेथलिया

माजलगाव : शहरातील जुन्या कोर्ट रोडवर, श्री सिद्धेश्वर महाविद्यालय च्या बाजूला २८ मार्च रोजी सकाळी ११ वाजता विविध मान्यवरच्या हस्ते होणाऱ्या जेथलिया हॉस्पिटल च्या उदघाटन सोहळ्यास आपण सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन डॉ ऋषिकेश जेथलिया यांनी केले आहे.

२८ मार्च रोजी माजी सार्वजनिक बांधकाम व ऊर्जा मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्या हस्ते तसेच महादेव महाराज चाकरवाडीकर व..... यांच्या शुभाशीर्वादाने, आ प्रकाश दादा सोळंके यांच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या या उदघाटन सोहळ्याला माजी आ मोहनराव सोळंके,माजी आ राधाकृष्ण होके पाटील,गंमत भंडारी, रमेश आडस्कर, मोहन जगताप, बाबुराव पोटभरे, सहाल चाऊस,ओमप्रकाश शेटे, अशोकराव डक, दयानंद स्वामी,नितीन नाईकनवरे, जयदत्त नरवडे, श्रीहरी मोरे, डॉ अशोकराव बडे, डॉ सुरेश साबळे, मिलिंद आव्हाड, अरुण राऊत, ज्ञानेश्वर मेंडके,मधुकर घुबडे, डॉ महेंद्र गोशाल, डॉ गणेश पांगरकर, डॉ राहुल जाजू आदी मान्यवर उपस्थित रहाणार आहेत. २८मार्च रोजी होणाऱ्या या उदघाटन सोहळ्यास उपस्थित रहाण्याकचे आवाहन डॉ ऋषिकेश संतोष जेथलिया यांनी केले आहे.

दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार, दि. २६ मार्च २०२४


# माजलगावात समाजकंटकाकडून मुस्लिम समाजाच्या भावना दुखावण्याचा प्रयत्न !

## त्या समाज कंटकांविरोधात पोलिस कडक कारवाई करणार-नंदकुमार ठाकुर

**माजलगाव । प्रतिनिधी**

धुलीवंदनाच्या दिवशी अज्ञात समाजकंटकाकडून झेंडा चौकात एका मुद्यावरून मुस्लिम समाजाच्या भावना दुखावण्याचा प्रयत्न करण्यात आला.हा निंदनीय प्रकार असून त्या समाजकंटकांवर पोलीस कडक कार्यवाही करणार असल्याचा शब्द पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी दिला.दरम्यान यावेळी पोलिस अधिक्षकांनी संतप्त मुस्लिम जमावाला शांत करणाऱ्या उपविभागीय पोलिस अधिकारी आय.पी.एस.बी. धीरजकुमार यांच्यासह मुस्लिम नेत्यांचे कौतुक केले.

शहरातील झेंडा चौकात असणाऱ्या मरकस मस्जिदच्या भिंतीवर कोणीतरी अज्ञात समाजकंटकाने जय श्रीराम असा मजकूर लिहिला होता.या घटनेने मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्या. त्यामुळे हजारो मुस्लिम तरुणांनी शहर पोलीस





ठाण्यात आरोपीला शोधून काढून त्याच्यावर कडक कार्यवाही करण्यासाठी ठिय्या केला होता.दरम्यान यामुळे शहरात दहशतीचे वातावरण पसरले होते. पोलिसांनी या घटनेत अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला आहे.या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी मंगळवार दि.२६ मार्च रोजी दुपारी माजलगाव शहराला भेट दिली.यावेळी आयोजित शांतता कमिटीच्या बैठकीत त्यांनी सांगितले की, अशा घटना निंदनीय आहेत.समाजा- समाजात तेढ निर्माण करण्यासाठी एक वर्ग सक्रिय आहे. अशा लोकांपासून सर्वांनी दक्ष राहिले पाहिजे.येत्या काळात रमजान ईद,रामनवमी,डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, इत्यादी उत्सव आहेत.ते सर्व उत्सव आपल्याला शांततेत साजरे करायचे आहेत. समाजकंटक कुठल्याही जातीचा असो पोलीस त्यावर कडक कारवाई करणार आहे.सोशल मीडियावरही पोलिसांचे लक्ष असल्याचेही ते म्हणाले.या बैठकीला सय्यद जाकीर मौलाना, माजी नगराध्यक्ष सहाल चाऊस, माजी नगराध्यक्ष शेख मंजूर,दयानंद स्वामी,तुकाराम येवले,अभय होके, मुजम्मिल पटेल त्यांनी बैठकीत शांततेचे आवाहन केले.या बैठकीला उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.बी.धीरजकुमार, पो.नि.केतन राठोड, इदरीस पाशा, मोबीन पठाण, सलाउद्दीन शेख, मनोज फरके, फारुकअण्णा, असलम मिर्झा, आदी उपस्थित होते.

### धुमसत्या माजलगाव शहरावर पोलिसांचे बारी

गेल्या पाच सहा महिन्यापासून माजलगाव इ धुमसत आहे. या परिसरात काही विघ्न संतोष आहेत. येथील शांतता बिघडविण्याचे काम आहेत. मराठा आरक्षण लढ्यातही हा विघ्न। कार्यरत होता. जाळपोळीच्या घटना या शहरा त्याचे लोन जिल्हासह संपूर्ण राज्यात पसरले सोशल मीडियासह, जातीय, धार्मिक तेड पस अपप्रतीविरुद्ध व माजलगाव शहराला धुमस पोलिसांचे बारीक लक्ष आहे.



# श्री क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थांनच्या पायी दिंडीचे पैठणकडे प्रस्थान

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

श्री संत एकनाथ षष्ठी प्रित्यर्थ पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थांनच्या पायी दिंडीचे पालखी सह दि.२६ मार्च २०२४ मंगळवार रोजी मठाधिपती गुरुवर्य महादेवानंद भारती महाराज यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात पैठणकडे प्रस्थान झाले.या पायी दिंडी सोहळ्यात पताकेधारी, झेंडेकरी,टाळकरी सह भाविक-भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. पायी दिंडी पालखी सोहळ्यात ह.भ.प. परमानंद भारती महाराज,प्रेमानंद महाराज,बजगुडे महाराज आदी सहभागी झाले आहेत.

# शेख अरहानचा पवित्र माहे रमजान मधील पहिला रोजा पूर्ण

**पाटोदा । प्रतिनिधी**

इस्लाम धर्मात पवित्र माहे रमजान या महिन्याला अनन्य साधारण महत्व आहे. या महिन्यात सर्वच मुस्लिम बांधव यांच्या वर रोजा(उपवास) फर्ज(बंधनकारक)असतात. लहानपणापासून ते मोठ्या व्यक्ती पर्यंत या माहे रमजान महिन्यांमध्ये रोजा धरतात. पालकांना रोजा(उपवास) करतांना पाहून घरातील लहान मुलांनाही रोजा धरण्याची लालसा निर्माण होते. आणी त्यामुळे हे लहान चिमुकले ही मोठ्यांचे अनुकरण करीत रोजा(उपवास)धरतात आणी पूर्ण करतात. अशाच प्रकारे वाळुज(संभाजीनगर)येथील



सामाजिक कार्यकर्ते शेख अजहर पटेल यांचा मुलगा व पाटोदा येथील पत्रकार शेख महेशर ताहेर यांचा पुतण्या शेख अरहान अजहर पटेल वय वर्षे ०७ यांने आपल्या आयुष्यातील माहे रमजान मधील पहिला रोजा पुर्ण केला आहे. मुस्लिम समाजात पवित्र असणाऱ्या या माहे रमजान महिन्यात संपूर्ण महिनाभर दिवसभर अन्न व पाणी न घेता हे रोजा(उपवास)ठेवला जातो या वाढलेल्या तापमानाचा व उष्णतेचा मोठ्या माणसांना देखील खूप त्रास होतो त्यात या ०७ वर्षाच्या चिमुकल्याने पहिला रोजा ठेवला व पुर्ण केला. त्याचे या बद्दल कुटुंबियांसह, नातेवाईक, आप्तेष्ट, मित्र परिवाराने कौतुक करून अभिनंदन केले आहे.

# कड्याच्या पहिल्या महिला सरपंच पारूबाई सांगळे यांचे निधन

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील सर्वात मोठी समजल्या जाणाऱ्या कडा ग्रामपंचायतच्या पहिल्या महिला सरपंच पारूबाई दिनकरराव सांगळे (वय वर्ष ६५) यांचे अल्पशा आजाराने सोमवारी निधन झाले.



दिवंगत पारूबाई सांगळे या कडा ग्रामपंचायतच्या २००२ साली आ.सुरेश धस यांच्या पार्टीकडून पहिल्या महिला सरपंच झाल्या होत्या. त्यांनी गावामध्ये मोठ्या प्रमाणात विकासाची कामे केल्याने महिला सरपंच ही पुरुषांपेक्षा कमी नाही हे दाखवून दिले होते. यामध्ये प्रामुख्याने कडा येथील पाणीपुरवठ्यासाठी देवी निमगाव तलावातून नवीन पाईपलाईन करणे ,शाळा खोल्याचे बांधकाम करणे, गावातील रस्ते ,गटारीचे कामे मोठ्या प्रमाणात त्यांनी त्यावेळी केले होते. गेल्या काही दिवसापासून त्या अल्पशा आजाराने त्रस्त होत्या. त्यातच सोमवारी पहाटे त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पार्थिवावर राहत्याघराजवळ शेतामध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात संपत सांगळे, शंकर सांगळे ही दोन मुले तर सुना , नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या अंत्यविधीला आष्टी तालुक्यासह अनेक ठिकाणहून शैक्षणिक, राजकीय, धार्मिक, सामाजिक, वकील,डॉक्टर, पत्रकार मंडळी मोठ्या प्रमाणात उपस्थित होती.

# बसस्थानक, सुभाष रोडवरील अतिक्रमणे हटवली

## बीड शहर वाहतूक शाखा व न.प. प्रशासनाची संयुक्त कारवाई

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील बस स्थानक परिसर, सुभाष रोड परिसर रस्त्यावरील अतिक्रमणे तसेच शाहूनगर भागातील अतिक्रमणे शहर वाहतूक शाखा आणि नगरपालिका प्रशासनाने हटवली. ही संयुक्त कारवाई मंगळवारी करण्यात आली.

बीड शहरामध्ये मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे वाढली आहेत. या अतिक्रमणाने वाहतुकीला अडथळा निर्माण होतो. याचा नागरिकांना त्रास होतो .वारंवार येणाऱ्या तक्रारीवरून बीड बस स्थानक परिसर, सुभाष रोडवरील दुकानासमोर लावलेले



बोर्ड आणि शेड, शाहूनगर भागातील रस्त्यावर दुकानासमोर पुढे आलेले बोर्ड आणि लावलेले शेड दुकानदाराचे सामान ही सर्व अतिक्रमणे हटवण्यात आली. ही कारवाई बीड शहर वाहतूक शाखा आणि नगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आली. या कारवाईत स.पो.नी सुभाष सानप यांच्यासह पो.उप .नि. विजय जाधवर कुटुंबरे , सय्यद ,पोलीस उपनिरीक्षक राख, पोलीस जमादार मोतीराम राख , नितीन शिंदे ,पोलीस नाईक सचिन सारणीकर, बिबीशन शिंदे, पोलीस वाहन चालक नारायण वाघमारे, पोलीस हवालदार नागरगोजे, पोलीस जमादार सारूक, नगरपालिकेचे अतिक्रमणविरोधी पथक आदींची उपस्थिती होती. यापुढेही कारवाई सुरूच राहील अतिक्रमण धारकांनी आपापले बोर्ड ,समोर आलेले अँगल, शेड स्वतःहून काढून घ्यावेत. असे आवाहन स. पो.नी.सुभाष सानप यांनी केले आहे.

# आवरगाव येथे दहा वर्षांची व्यसनमुक्त व शुद्ध शाकाहारी धुरवडीची परंपरा कायम

**किल्लेधारुर । प्रतिनिधी**

तालुक्यातील आदर्श असणाऱ्या आवरगाव येथे गेल्या दहा वर्षांपासून अखंडित पणे मांसाहार, मद्यपान,धूम्रपान विरहित धुरवड करत विकृत परंपरांवर या उपक्रमाद्वारे बहिष्कार टाकत शुद्ध शाकाहारी व व्यसनमुक्त धुरवड केली जात आहे या धुरवडीत तीन पिढ्या एकत्र येऊन शुद्ध शाकाहारी धुरवड साजरी करतात त्यात पुलाव,भजे,चिप्स,व गोड पदार्थ सर्व फळे व स्प्राईट,थम्सप पिऊन मोठ्या उत्साहात एकत्रित येऊन हि धुरवड साजरी करतात,

गावचे आदर्श सरपंच श्री अमोल भैया जगताप यांच्या संकल्पनेने गेल्या दहा वर्षांपासून



अखंडित मांसाहार, मद्यपान,धूम्रपान विरहित धुरवड करत शुद्ध शाकाहारी व व्यसनमुक्त धुरवड चालू आहे यात गावातील सर्व ग्रामस्थ व गावातील आजोबा वडील व नातरुंड या तीन पिढ्या एकत्रित येत मोठ्या उत्साहात धुरवडीत सहभागी होतात व मोठ्या उत्साहात गावच्या सामाजिक कार्या बाबत व विकासा बाबत चर्चा करत धुरवड साजरी करतात,सरपंच अमोल भैया जगताप यांच्या संकल्पनेचे व आवरगाव येथील सर्व नागरिक एकत्र येऊन या साजऱ्या करत असलेल्या धुरवडी चे सर्वस्त्रातून कौतुक होत आहे व हि बाब आदर्श घेण्यासारखी आहे.

# दानिश कलेक्शन कपड्याच्या दुकानास भीषण आग

## दुकानातील रमजान व इतर सणासाठी भरलेल्या वीस लाखाचा माल जाळून खाक

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरातील दवाखाना रोडच्या मुख्य रस्त्यावर असलेल्या सदर बाजार परिसरातील मुकुंदराज कॉम्प्लेक्स मधील दानिश कलेक्शन या कपड्याच्या दुकानाला पहाटे चारच्या सुमारास शॉर्टसर्किट मुळे आग लागल्याचे निदर्शनास आले. या आगीत दुकानातील जुना व नवीन मिळून वीस लाखाच्या वर किमतीचा कपड्याचा माल आगीच्या भक्ष्यस्थानी पडला आहे. यामुळे दुकानाचे मालक वाजेद पटेल यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या दुर्घटने बाबत सदर बाजार परिसरात



हळहळ व्यक्त केल्या जात आहे. आगीचे वृत्त समजताच अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी धाव घेऊन दुकान मालक वाजेद पटेल व त्यांच्या परिवाराचे सांत्वन केले.

सध्या मुस्लिम समाजाचा पवित्र रमजान महिना सुरु आहे. काही दिवसातच रमजान ईद येत असल्याने सर्व दुकानदारानी नवीन कपड्याची खरेदी मोठ्या प्रमाणावर करून शहरातील बऱ्याच व्यापाऱ्यानी आपापली दुकाने सजवून ठेवली आहेत.

शहरातील असेच एक दानिश कलेक्शन हे देखील नवीन व जुन्या कपड्याच्या मालाने खचाखच भरले होते. नित्यनियमाने वाजेद पटेल संध्याकाळी दुकान बंद करून घरी गेले. मात्र भल्या पहाटे साडे चारच्या दरम्यान यांच्या दुकानाला आग लागून दुकानातून धुराचा लोट येत असल्याचे त्यांना कळाले. त्यांनी धावतपळत येऊन दुकान उघडले असताना दुकानातील सर्व कपड्याच्या मालास आग लागल्याचे दिसून आले. आगीने रौद्र रूप पाहून तात्काळ अग्निशमन दलास पाचारण करण्यात आले. मात्र अग्निशमन घटनास्थळी दाखल होईपर्यंत दुकानातील बराच माल जळून खाक झाला होता. सदर आगीच्या दुर्घटनेची माहिती कळताच माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी , सामाजिक कार्यकर्ते सय्येद ताहेर व वाजेद पटेल यांचा मित्र परिवार यांनी घटनास्थळी पोहोचून आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले. राजकिशोर मोदी यांनी दानिश कलेक्शनचे मालक वाजेद पटेल यांचे सांत्वन करून त्यांना धीर देऊन आपण त्यांच्या सदैव पाठीशी असल्याचे सांगितले.

दुकानात असलेल्या सर्व मालाचा झालेला कोळसा बघून परिसरात नागरिक व मित्रपरिवार हळहळ व्यक्त करताना दिसून येत होते.

# अंधश्रद्धेला मूठमाती देऊन नेत्रदान करा- पद्मश्री डॉ.लहाने

## शेतकरी कीर्तन महोत्सवात शेकडो रुग्णाची तपासणी व मोफत उपचार

परळी । प्रतिनिधी

नेत्रदान केल्याने पुनर्जन्म मिळत नाही अशी अंधश्रद्धा समाजात मोठ्या प्रमाणात असून रावणाच्या लंकेत (श्रीलंका ) दरवर्षी १ लाख लोक मरतात तर २ लाख नेत्रदान करण्यात येते आणि राम राज्यात ( भारत देशात ) ८ लाख लोक मरतात तर केवळ ७० हजार नेत्र दान होते.नेत्रदान करणे चुकीचे आहे ही फक्त अंधश्रध्दा असून असून अंधश्रद्धा बाळगू नका, विज्ञानाची कास धरा,देशात लाखो रुग्णाना डोळ्यांची गरज आहे नेत्रदान करा शेतकऱ्यांनी पारंपारिक व अनुकरण न करता विज्ञानाची कास धरत शेतामध्ये नवनवीन प्रयोग करून आपल्या शेतातील पिकात वाढ करा असा सल्ला पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने यांनी कान्नापूर येथे आयोजित शेतकरी कीर्तन महोत्सवात शेतकऱ्यांना दिला.

जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या बीजोत्सवाच्या निमित्ताने धारुर तालुक्यातील कान्नापूर येथे दुस-या शेतकरी कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून

या कीर्तन महोत्सवात शेतकरी आरोग्याला प्राधान्य दिले असून दर दिवशी एका आजारावर आरोग्य शिबीर आणि मार्गदर्शन केले जात आहे. आरोग्य विषयक तज्ज्ञ डॉक्टर या आरोग्य शिबिरात मार्गदर्शन व उपचार करत आहेत.

या कीर्तन महोत्सवात मानसोपचार तज्ज्ञ डॉ. हमीद दाभोळकर, कर्क रोग तज्ज्ञ डॉ. हरीराम गडदे यांचे मार्गदर्शन आणि आरोग्य तपासणी संपन्न झाली असून सोमवार दि २५ रोजी पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने व त्यांची संपूर्ण टीम या कीर्तन महोत्सव प्रसंगी आरोग्य तपासणी करिता उपस्थित होती.यावेळी मार्गदर्शन करताना डॉ.लहाने यांनी आपल्या बालपणीच्या आठवणींना उजाळा देत आपण स्वतः शेतकरी कुटूंबातील असून शेतात मजुरी करून शिक्षण पूर्ण करत ह्या टप्प्यावर आलो हे विशद केले. .यावेळी त्यांनी आपल्या आईच्या उल्लेख करताना



भावनीक होत म्हणाले की, आई अडाणी असून मला आई ने शिकविले एवढेच नव्हे तर २९ वर्षांपूर्वी आईने स्वतःची किडनी मला अवयव दान केल्याने आज आपणासमोर उभा आहे. व्यक्तीला आयुष्यात फक्त शिक्षण हेच सन्मान मिळवून देतो,ऐपत नसणाऱ्या गोरगरीब गरजू व्यक्तींसाठी तत्परतेने अशा शिबिरातून काम करत आलो आहोत माझा पुनर्जन्म मी सर्वस्वी सामाजिक कार्यासाठी स्वतःला वाहून घेण्यासाठी वापरत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले खऱ्या अर्थाने ग्रामीण भागात निदाना अभावी रोग वाढत जातात म्हणून अशा स्तुत्य आरोग्य शिबिराची आवश्यकता असते आणि या शेतकरी कीर्तन महोत्सवातून एड.अजय बुरांडे अशा कार्यक्रमांचे आयोजन करून सामाजिक जबाबदारी पूर्ण

करत आहेत या शेतकरी कीर्तन महोत्सवाच्या रुपात विज्ञानाचे वारे ग्रामीण भागात सुरू झाले असून २१ गावाने आयोजित केलेल्या या महोत्सवात पुढील वर्षी आणखी जास्त गाव सहभागी होतील अशी अपेक्षा आहे असे ही त्यांनी सांगितले.

**डोळ्याचे आरोग्य जपा- ग्रामीण भाषेत मार्गदर्शन**

अस्सल ग्रामीण अबाल-वृद्धांना समजेल अशा भाषेत मार्गदर्शन करताना डॉ.लहाने यांनी सांगितले की,मूल जन्माला आल्यानंतर वयाच्या तिसऱ्या महिन्यात आणि तिसऱ्या वर्षी बालकांची डोळ्याच्या आरोग्य तपासणी आवर्जून करावी वयाच्या सहाव्या वर्षापर्यंत लहान मुलांना कसल्याही परिस्थितीत मोबाईल हातात देऊ नये, आरोग्य शास्त्रातील संशोधनानुसार पाच टक्के मेंदूचे कॅन्सर हे मोबाईलच्या रेडिओ फ्रिक्वेन्सी मुळे होत आहेत तेव्हा बालकांच्या आरोग्याची विशेषता डोळ्याची निगा राखणे हे प्रत्येक आई-वडिलांचे कर्तव्य असून मोबाईल पासून बालकांना आणि मुलांना दूर ठेवावे तसेच प्रत्येक व्यक्तीने देखील मोबाईलचा वापर कमी करावा जेणेकरून डोळ्याचे, मेंदूचे व आरोग्याच्या समस्या उद्भवणार नाहीत.

### रंजल्या गांजले यांची सेवा हिच खरी ईश्वरसेवा

दि २५ मार्च रोजी प्रसिद्ध नेत्र रोग तज्ञ पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या शिबिरास परिसरातील स्त्री-पुरुष, तरुणांनी मोठ्या प्रमाणात गर्दी करून सहभाग नोंदवला.स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय आंबेजोगाई येथील नेत्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. शेळके सर आपल्या टीम सह उपस्थित होते त्यांनी सुद्धा अत्यंत अभ्यासपूर्ण पद्धतीने डोळ्याचे आरोग्य, डोळ्याचा आणि मधुमेहाचा असलेला संबंध त्यातून निर्माण होणारी आजाराची गुंतागुंत याविषयी सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमानंतर झालेल्या आरोग्य शिबिरात ४६३ रुग्णांचे डोळे तपासण्यात आले आवश्यक गरजू लोकांना ड्रॉप्स औषधे देण्यात आली यात ७० मोतीबिंदू पिकलेली रुग्ण आढळून आली त्यांच्या शस्त्रक्रियेसाठी पुढील आठवड्यात दोन टप्प्यात कॅम्प आयोजित करून त्यांच्या डोळ्यांचे विनामूल्य ऑपरेशन करण्यात येणार आहे.

cmyk




# राज्यात पुन्हा पाऊस बरसणार

## विदर्भातील जिल्ह्यांना आयएमडीचा इशारा!

पुणे : राज्यातील अनेक भागांमध्ये सध्या उन्हाच्या झळा सोसाव्या लागत आहेत. अनेक जिल्ह्यांमध्ये तापमान ४० अंश सेल्सिअसच्या वरती असलयाचे पाहायला मिळत आहे. अशातच आता २८ मार्चनंतर वातावरणात बदल पाहायला मिळणार आहे. विदर्भात २८ मार्चनंतर सर्वच जिल्ह्यांमध्ये ढगाळ हवामानासह पाऊस होण्याची शक्यता आहे. असा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने (आयएमडी) व्यक्त केला आहे. प्रामुख्याने विदर्भातील चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

राज्यात सध्या नागपूर, वर्धा, अमरावती, बुलढाणा, मालेगाव, अकोला, यवतमाळ, सोलापूर या ठिकाणी ४० अंशाहून अधिक तापमान आहे. तर मागील २४ तासांमध्ये राज्यातील सर्वच भागांमध्ये ३७ ते ३९ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले आहे. ज्यामुळे सध्या राज्यात सर्वच जिल्हे तापले असून, उन्हाच्या झळांमुळे नागरिक बेजार झाले



आहेत. त्यातच आता २८ मार्चनंतर राज्यातील विदर्भातील जिल्ह्यांमध्ये पाऊस होण्याची शक्यता आहे. तर पश्चिम-दक्षिण महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या खोऱ्यातील आसपासच्या जिल्ह्यांमध्ये देखील पावसाची शक्यता आहे. ज्यामुळे आता उष्णतेचा लाटेपासून काहीसा दिलासा मिळणार आहे. गेल्या नोव्हेंबर महिन्यापासून अनेकदा झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतीपिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अशातच आता पुन्हा एकदा विदर्भात पाऊस होणार असल्याने, शेतकऱ्यांचे टेन्शन वाढले आहे.

तीन दिवस 'या' राज्यांमध्ये पावसाची शक्यता : दरम्यान, आसाम, मेघालय, पश्चिम बंगाल, सिक्कीम, उत्तर ओडिसा, पूर्व झारखंड, पूर्व विदर्भ, छत्तीसगड आणि अरुणाचल प्रदेशात विजांच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याचा वारा, हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. तर ईशान्येकडील राज्यांमध्ये देखील पाऊस होण्याची शक्यता आहे. तर २६ मार्च ते २९ मार्चदरम्यान पश्चिम हिमालयीन प्रदेश आणि वायव्य भारताच्या लगतच्या मैदानी भागात पावसाची शक्यता आहे. असेही हवामान विभागाने आपल्या अंदाजात म्हटले आहे.

## पहिल्या कृषी विज्ञान केंद्राला ५० वर्षे पूर्ण

पुणे : बदलती शेतीपद्धती व आधुनिक तंत्रज्ञान यांची माहिती शेतकऱ्यांना होण्यासाठी कृषी विज्ञान केंद्र हे जणू ज्ञानाचे मंदिरच ठरले आहे. गेल्या ५० वर्षांपूर्वी भारतीय कृषी संशोधन परिषदेने देशातील पहिले कृषी विज्ञान केंद्र २१ मार्च १९७४ रोजी पुद्दुचेरी (तमिळनाडू) येथे स्थापन केले होते. या वाटचालीला आता ५० वर्षे पूर्ण झाली असून सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे केले जात आहे. आता देशभरात या केंद्रांचे जाळे पसरले आहे.

देशभरात कृषी विज्ञान केंद्रामार्फत आजवर शेतकऱ्यांना आधुनिक कृषी पद्धतींचे धडे दिल्याने कृषी व पूरक व्यवसायात अनेक प्रयोगशील शेतकरी घडले आहेत. सध्या कृषी तंत्रज्ञान अनुप्रयोग संशोधन संस्था (अटारी)यांचे देशात ११ विभाग आहे. १९७४ साली देशात पहिले कृषी विज्ञान केंद्र पुदुच्चेरी येथे तर १९७६ साली महाराष्ट्रात पहिले केंद्र कोसबाड (जि. पालघर) या आदिवासी भागात स्थापन झाले होते. सध्या देशभरात ७३१ कृषी विज्ञान केंद्र कार्यरत असून ५४५ जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी एक तर ९३ जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी २ आहेत. शिक्षण आयोगाच्या (१९६४-६६) दरम्यानच्या शिफारशींवर आधारित नियोजन आयोग आणि आंतर-मंत्रालयीन समितीने चर्चेअंती १९७३ साली भारतीय कृषी संशोधन परिषदेने डॉ. मोहन सिंग मेहता यांच्या अध्यक्षतेखालील समिती




नेमली होती. त्यानुसार कृषी विज्ञान केंद्राची संकल्पना पुढे आली. त्यानुसार प्रायोगिक तत्त्वावर पहिल्या कृषी विज्ञान केंद्राची स्थापना २१ मार्च १९७४ साली कोईम्बतूर येथील तमिळनाडू कृषी विद्यापीठाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली पुदुच्चेरी येथे स्थापना करण्यात आली होती. त्यातून पुढे केंद्राचा विस्तार देशभर टप्प्याटप्प्याने झाला आहे.

प्रत्येक जिल्ह्यात एक कृषी विज्ञान केंद्र : १९७४ ते २००५ या कालावधीत टप्प्याटप्प्याने २९० केंद्रे झाली होती. २००५ साली स्वातंत्र्य दिनाच्या भाषणात तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी २००७ च्या अखेरीस देशातील प्रत्येक ग्रामीण जिल्ह्यात एक कृषी विज्ञान केंद्र स्थापनेची घोषणा केली होती. त्यानुसार राज्य कृषी विद्यापीठे आणि केंद्रीय कृषी विद्यापीठ, भारतीय कृषी संशोधन परिषद, राज्य सरकार, अशासकीय संस्था, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम व इतर शैक्षणिक संस्थांच्या अंतर्गत ते स्थापन होऊन कृषी तंत्रज्ञान विस्तारात योगदान देत आहेत.

## जनवरांतील संसर्गजन्य गर्भपाताचे नियंत्रण

संसर्गजन्य गर्भपात (ब्रुसेलोसिस) हा एक अत्यंत महत्त्वाचा जिवाणूजन्य आजार आहे. हा आजार जनावरे तसेच मनुष्यामध्ये आढळून येतो. गाभण जनावरांमध्ये मोठ्या प्रमाणात गर्भपात होतो. गर्भपात सहसा गाभण काळात ७ ते ९ महिन्यांदरम्यान होतो. जिवाणूचा संसर्ग प्रामुख्याने गायी, शेळ्या आणि मेंढ्यांमध्ये होतो, परंतु तो मनुष्यामध्ये संक्रमित होतो. यामुळे महिलांमध्ये वारंवार गर्भपात, ताप, सांधेदुखी आणि थकवा यासारखी लक्षणे दिसतात. पुरुषांमध्ये कायमचे व्यंधत्व येते. बाधित गाई, म्हशींच्या दुधामधून आजाराचा प्रसार होतो.

आजारामुळे गर्भपात, वासराचा मृत्यू, दुधाचे उत्पादन कमी होणे, जनावरांमध्ये कायमस्वरूपी वंध्यत्व येते, भाकड कालावधी वाढतो. नियंत्रणासाठी नियमित चाचणी तसेच शिफारशीत लसीकरण महत्त्वाचे आहे. आजार कळपातील जनावराला झाला तर, कळपातील इतर गाई, म्हशींमध्ये बाधित चारा, पाणी, अथवा पैदाशीसाठी वापरल्या जाणाऱ्या वळू मार्फत आजार पसरतो. कळपातील बाधित वळू सर्व माद्यांना नैसर्गिक रेतनाद्वारे बाधित करतो. सक्रियपणे आजार प्रतिबंधक उपायांचा अवलंब न केल्यास पूर्ण कळप बाधित होण्यास फार वेळ लागत नाही.

वळूमधील लक्षणे : आजार प्रजनन संस्थेवर परिणाम करतो. वळू तसेच गाई, म्हशींमध्ये आजाराचा प्रसार होतो. वळूला संसर्ग होतो, तेव्हा तो संभाव्य वाहक बनतो. संपूर्ण कळपात आजार पसरतो. नैसर्गिक रेतनादरम्यान बाधित वळूच्या वीर्यामार्फत गाई आणि म्हशींमध्ये



संक्रमण होते. बाधित वळूमध्ये प्रजनन समस्या दिसतात. परिणामी प्रजनन कार्यक्षमता आणि रोगप्रतिकारक शक्ती कमी होते. सुजलेले अंडकोष, शुक्राणूंची गुणवत्ता आणि वीर्यातील शुक्राणूचे प्रमाण कमी होते. यासारखी चिन्हे दिसू शकतात, कालांतराने कायमचे वंध्यत्व येते. यामुळे वळू प्रजनन क्षमतेवर परिणाम होतो. गर्भधारणेचे प्रमाण कमी होते. यासाठी वळूमधील ब्रुसेलोसिस चाचणी आवश्यक आहे.

गाई, म्हशीमधील लक्षणे :

गाभण काळात सहा ते नऊ या महिन्यात गर्भपात होतो. व्यायलेल्या गाई,म्हशीमध्ये बारा तासानंतरही वार अडकून रहातो. दूध उत्पादनात लक्षणीय घट होते. गर्भपात झाल्यानंतर गर्भाशयामध्ये दाह आणि नेक्रोसिस लक्षणे दिसू शकतात. ताप, सुजलेले सांधे आणि अशक्तपणा ही लक्षणे दिसतात.

नियंत्रणासाठी कृत्रिम रेतन : नैसर्गिक गर्भाधारणेदरम्यान बाधित वळूपासून गाई,म्हशींना प्रजनन विकार होण्याची शक्यता असते. नैसर्गिक गर्भधारणा करण्यापेक्षा, कृत्रिम रेतनचा अवलंब फायदेशीर ठरतो. ब्रुसेलोसिससह इतर आजार पसरण्याचा धोका कमी होतो. या तंत्रज्ञानातून उत्कृष्ट अनुवंशशास्त्र पद्धतीने वासरांची पैदास करता येते.

निदान चाचण्या : रोझ बंगाल प्लेट टेस्ट (आरबीपीटी) करावी. ही सोपी, कमी खर्चात होणारी, शेतकऱ्यांना करता येण्याजोगी आहे. रक्त किंवा सेरमचा एक थेंब आणि आरबीपीटी अँटीजेनचा एक थेंब काचपट्टीवर घेऊन तपासले असता तीन मिनिटात गाय, म्हैस, वळू ब्रुसेलोसिस बाधित आहे का नाही हे कळू शकते. गाई, म्हशी, वळू खरेदीपूर्वी जागेवर चाचणी करू शकतो. यासाठी ५० रुपये एवढा खर्च येतो. गर्भपात झालेल्या गर्भाच्या ऊतींमध्ये किंवा गाई, म्हशींच्या रक्ताच्या नमुन्यांमध्ये ब्रुसेला जिवाणू ओळखण्यासाठी बॅक्टेरियल कल्चर आणि पॉलिमरेज चेन रिॲक्शन (पीसीआर) तंत्र वापरतात. या चाचण्यांद्वारे लवकर तपासणी करणे महत्त्वाचे आहे. पशुवैद्यकाशी संपर्क साधून जनावरांची तपासणी करून गर्भपाताचे कारण निश्चित करावे.

## राज्यात खासगी साखर कारखान्यांचा उस गाळपात बोलबाला ;कोल्हापूर विभाग सरस

पुणे : राज्यातील सुमारे २११ साखर कारखान्यांचा गळीत हंगाम हा पुढील दोन एक आठवड्यात संपण्याची शक्यता आहे. तर राज्यातील ७३ साखर कारखान्यांनी गाळप याआधीच बंद केले असून अद्याप १३८ साखर कारखाने सुरू आहेत. तर यंदाच्या गळीत हंगामात सर्वाधिक गाळप हे खासगी साखर कारखान्यांनी केले आहे. यंदाच्या गाळप हंगामात राज्यात १ हजार १२ लाख मेट्रीक टन उसाचे गाळप झाले. तर १ हजार २८ लाख क्विंटल साखर तयार झाली आहे. सर्वाधिक गाळप हे कोल्हापूर विभागात झाले असून दुसऱ्या क्रमांकावर पुणे विभाग आहे.

गेल्या वर्षी निसर्गाच्या लहरीपणाचा फटका शेतीला बसला. कमी पावसामुळे उसाचे उत्पादन कमी होईल, अशी शक्यता होती. मात्र नोव्हेंबर महिन्यात झालेल्या पावसामुळे उसाचे उत्पादन भर पडली. यामुळे साखरेचे उत्पादन चांगले झाले आहे. १८ मार्चला आलेल्या अहवालानुसार राज्यात कोल्हापूर विभाग उस गाळपात अग्रेसर असून येथे २३२ लाख मेट्रीक टन गाळप झाले आहे. यानंतर पुणे विभागात २२३ लाख मेट्रीक टन गाळप झाले आहे.

शेटफळगढे येथील बारामती ॲग्रो प्रा. लि. या कारखाना गाळपात राज्यात पहिल्या क्रमांकावर असून कारखान्याने २१ लाख ३५ हजार ७२१ मेट्रीक टन उसाचे गाळप केले आहे. तर १९ लाख ५७ हजार ८०० क्विंटल साखर तयार केली आहे. यानंतर सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यातील जरंडेश्वर शुगर मिल्स प्रा. लि. या साखर कारखान्याचा दुसरा क्रमांक लागतो. या कारखान्याने १८ लाख ६० हजार २०० मेट्रीक टन उसाचे गाळप करत १६ लाख ३४ हजार ४०० क्विंटल साखरेचे उत्पादन घेतले आहे. यापाठोपाठ दौंड शुगर प्रा. लि. या साखर कारखान्याने उसाचे गाळपातून १६ लाख ३८ हजार क्विंटल साखरेचे उत्पादन घेतले असून १७ लाख २६ हजार मेट्रीक टन उसाचे गाळप केले आहे.

१०५ साखर कारखाने खासगी

यंदा राज्यातील कारखान्यांच्या गाळपाचा हंगाम संपत आला आहे. ७३ साखर कारखाने याआधीच बंद झाले आहेत. तर २११ साखर कारखान्यांपैकी १०६ सहकारी तर १०५ साखर कारखाने खासगी असून १३८ साखर कारखान्यांचा हंगाम अजून सुरू आहे. जो पुढील दोन एक आठवड्यात संपण्याची शक्यता आहे.



## रेशीम उद्योगाला चालना देण्यासाठी आता मिळणार शेडसाठीही अनुदान!

रेशीम उद्योगाला चालना देण्यासाठी राज्य सरकारने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. आता रेशीम कोशापासून धागा निर्मितीसाठी असलेल्या ऑटोमॅटिक रेलिंग मशिन ठेवण्यासाठी उभारण्यात येणाऱ्या शेडवरही अनुदान दिले जाणार आहे. शेडच्या आकारानुसार सरासरी ५० टक्के अनुदान देण्यात येणार आहे. यामुळे रेशीम उद्योगाला मोठी चालना मिळेल आणि राज्यातील रेशीम उत्पादकांना मोठा फायदा होईल.

महाराष्ट्रात सातत्याने रेशीम शेतीचा विस्तार होत आहे आणि कोष उत्पादकताही वाढली आहे. या पार्श्वभूमीवर उत्पादित कोषापासून धागा निर्मितीला राज्यात प्रोत्साहन दिले जात आहे. सध्या राज्यात सहा ऑटोमॅटिक रेलिंग मशिन लावण्यात आल्या आहेत. त्यासोबतच येत्या काळात नव्याने पाच उद्योगांना मान्यता देण्यात आली आहे. राज्याची कोष उत्पादकता पाहता २० उद्योग चालतील, असा अंदाज आहे.

मशीन आणि शेडसाठी अनुदान : एका ऑटोमॅटिक रेलिंग मशिनची किंमत सरासरी एक कोटी ४९ लाख रुपये आहे. त्यावर केंद्र सरकार ५० टक्के आणि राज्य सरकार २५ टक्के याप्रमाणे ७५ टक्के अनुदान देते. उर्वरित २५ टक्के रक्कम लाभार्थीला भरावी लागते. मशिन घेतल्यानंतर ती बसविण्यासाठीचे फाउंडेशन (पाया) आणि वरील शेड यावर सुमारे एक कोटी इतकाच सरासरी खर्च होतो. परिणामी या उद्योगाच्या उभारणीला मर्यादा आल्या होत्या. ही बाब लक्षात घेता रेशीम संचलनालयाच्या वतीने शेडसाठी देखील अनुदान मिळावे असा प्रस्ताव वस्त्रोद्योग मंत्रालयाकडे पाठविण्यात आला होता.

अनुदान मिळवण्यासाठी प्रक्रिया : या संबंधीचे प्रस्ताव जिल्हा रेशीम कार्यालयाला प्राप्त झाल्यानंतर ते मंजुरीसाठी राज्यस्तरीय समितीकडे पाठविण्यात येणार आहेत. सरकारच्या या निर्णयामुळे रेशीम उद्योगाला मोठी चालना मिळेल आणि राज्यातील रेशीम उत्पादकांना मोठा फायदा होईल.

समितीचे सदस्य : अध्यक्ष - रेशीम संचालक. सदस्य सचिव - रेशीम उपसंचालक. सदस्य - सार्वजनिक बांधकाम विभाग नागपूरचे कार्यकारी अभियंता. सदस्य - केंद्रीय रेशीम विकास मंडळ बंगळूरचे प्रतिनिधी. सदस्य - उपसचिव (रेशीम).



## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५५२: गुरू अमर दास शिखांचे तिसरे गुरू बनले.
१६६८: इंग्रजांनी इस्ट इंडिया कंपनीच्या मध्यमातून मुंबई प्रांतावर आपले अधिकार प्राप्त केले होते.
१७८०: ब्रिटीश वर्तमानपत्र ब्रीट गैजेट आणि संडे मॉनीटर यांचे प्रकाशण सर्वप्रथम रविवारच्या दिवशी करण्यात आले.
१९०२: नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचे केंद्रीय कायदेमंडळात अर्थसंकल्पावर इंग्रजीमध्ये अतिशय सुंदर असे पहिले भाषण झाले.
१९१०: लक्ष्मणराव किर्लोस्कर यांनी औंध संस्थानातील कुंडच्या माळावर कारखाना तसेच वसाहत उभारण्याच्या कामाला प्रारंभ केला. पुढे या परिसराला किर्लोस्करवाडी असे नाव रूढ झाले.
१९४२: इंदिरा नेहरू व फिरोझ गांधी यांचा विवाह.
१९४२: ऑस्विच येथील छळछावणीत पहिले महिला कैदी दाखल झाले.
१९७२: पहिली आंतरराष्ट्रीय संस्कृत परिषद संपन्न झाली.
१९७४: गढवालमधील हेनवलघाटी येथे गौरा देवी यांच्या नेतृत्त्वाखाली चिपको आंदोलनाची सुरूवात.
१९७९: अन्वर सादात, मेनाकेम बेगिन आणि जिमी कार्टर यांनी वॉशिंग्टन (डी. सी.) येथे इस्त्रायल-इजिप्त शांतता करारावर सह्या केल्या.
२०००: ब्लादिमिर पुतिन यांची रशियाच्या अध्यक्षपदी निवड झाली.
२०१३: त्रिपूरा उच्च न्यायालयाची स्थापना.
१९७१: बांगलादेश चा स्वातंत्र्य दिन.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८७४: अमेरिकन कवी रॉबर्ट फ्रॉस्ट यांचा जन्म.
१८७५: दक्षिण कोरियाचे पहिले राष्ट्राध्यक्ष सिंगमन र्ही यांचा जन्म.
१८७९: स्विस-अमेरिकन सिव्हिल इंजिनियर ओथमार हमेन अम्मान यांचा जन्मदिन. त्यांनी डिझाईन केलेल्या ब्रिज डिझाईन्समध्ये जॉर्ज वॉशिंग्टन ब्रिज, वेर्राझानो-नारोज ब्रिज आणि बायोन ब्रिज यांचा समावेश आहे.
१८९८: जर्मन स्पोर्ट्सवेअर कंपनी पुमा व ॲडिडासचे संस्थापक रुडॉल्फ ''रुडी'' डसलर यांचा जन्मदिन.
१९०७: हिन्दी कवयित्री, स्वातंत्र्यसैनिक, शिक्षणतज्ञ महादेवी वर्मा यांचा जन्म. (मृत्यू: ११ सप्टेंबर १९८७)
१९०९: साहित्यिक, संशोधक, दैनिक गोमंतक चे पहिले संपादक बाळकृष्ण दत्तात्रेय तथा बा. द. सातोस्कर यांचा जन्म. (मृत्यू: २७ नोव्हेंबर २०००)
१९१९: भारतीय राजकारणी, महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते आणि दिग्गज काँग्रेसचे नेते तासेच विधानसभेचे माजी सभासद व माजी कॅबिनेट मंत्री भिकाजीराव जिजाबा खताल- पाटील यांचा जन्मदिन.
१९२९: शीख धार्मिक नेत्यांच्या संत मतवादी वंशाचे आध्यात्मिक शिक्षक ठाकर सिंह यांचा जन्मदिन.
१९३३: हिंदी साहित्य व संस्कृतीचे लेखक आणि अभ्यासक कुबेर नाथ रे यांचा जन्मदिन.
१९६९: विक्रम राठोड, भारतीय क्रिकेट खेळाडू.
१९७३: गुगल चे सह-संस्थापक लॅरी पेज यांचा जन्म.
१९७३: लंडन स्टॉक एक्सचेंज ने २०० वर्ष जुने ऐतिहासिक नियम मोडीत काढत महिलांना पहिल्यांदाच नोकरीवर रुजू करून घेतले.
१९८५: झिम्बाब्वेचा क्रिकेट खेळाडू प्रॉस्पर उत्सेया यांचा जन्म.
१९८७: भारतीय फुटबॉल खेळाडू रॉविल्सन रॉड्रिग्ज यांचा जन्मदिन.
१९९८: पुमा से कंपनी चे निर्माते रुडॉल्फ दास्स्लेर यांचा जन्म. (मृत्यू: १९७४)


### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८२७: कर्णबधिर संगीतकार लुडविग व्हान बीथोव्हेन यांचे निधन. (जन्म: १६ डिसेंबर १७७०)
१८२५: वेस्टर्न युनियन चे सहसंस्थापक अंसन स्तागेर यांचे निधन. (जन्म: २० एप्रिल १८२५)
१९३८: लक्ष्मीनाथ बेझबरुआ, ज्येष्ठ असमिया साहित्यिक.
१९९६: के. के. हेब्बर, भारतीय चित्रकार.१९९७: नवकमल फिरोदिया, ज्येष्ठ गांधीवादी, स्वातंत्र्यसैनिक आणि उद्योगपती.
१९९८: डॉ. शांतिनाथ देसाई -कन्नड साहित्यिक.
१९९९: आनंद शंकर - संगीतकार.
२००१: जनार्दन हरी पटवर्धन - स्वातंत्र्यसैनिक आणि सनदी अधिकारी.
२००३: डॅनियेल पॅट्रिक मॉयनिहॅन - अमेरिकन सेनेटर, भारतातील अमेरिकेचे राजदूत आणि अमेरिकेच्या सिनेटमध्ये भारताची बाजू मांडणारा नेता.
२००३: हरेन पंड्या - गुजरातचे माजी मंत्री (हत्या).
२००३: देविदास सडेकर - मराठी पत्रकार.
२००६: भारतीय राजकारणी व भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे पश्चिम बंगाल राज्य समितीचे सचिव अनिल विश्वास यांचे निधन.
२००८: महाराष्ट्रीयन मराठी लेखक व दलित साहित्यिक बाबुराव बागूल यांचे निधन.
२०१२: प्रसिद्ध पराङ्मुख गीतकार व कवी माणिकराव गोडघाटे ऊर्फ ग्रेस यांचे निधन. (जन्म: १० मे १९४०).

# तलावांना भेटी देणाऱ्या जिल्हा प्रशासनाचे तलावाच्या भिंतीवरील झाडाझुडूपांकडे दुर्लक्ष

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात यंदाच्या हंगामात परतीचा अवकाळी पाऊस सोडता एकाही नदी-ओढ्यातुन पाणी वाहिले नाही. त्यामुळे जलस्त्रोताची पाणीपातळी तशीच राहिली.पावसाने ओढ दिल्याने उन्हाळ्यात तिव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत असुन पाणीटंचाई आढावा घेत आवश्यक उपाययोजना करण्याहेतुने जिल्हा प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी साठवण तलावांना प्रत्यक्ष भेट देऊन वस्तुस्थिती पाहत आहेत.मात्र याच पाणीटंचाईचा आढावा घेणा-या अधिका-यांना साठवण तलावाच्या पिचवर मोठ्या प्रमाणावर झाडेझुडपे असुन सुद्धा आणि दरवर्षी मान्सुनपुर्व दुरुस्तीचा कागदोपत्रीच खर्च दाखवत असताना याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करताना दिसत आहेत.यामुळे संबंधित प्रकरणात जिल्हाधिकारी यांनी लक्ष देऊन



आवश्यक उपाययोजना करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

बीड शहरापासून जवळ असलेल्या सोलापूर ते धुळे राष्ट्रीय महामार्गावरील पाली येथील बिंदुसरा धरणाच्या जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३ अंतर्गत साठवण तलावाच्या भिंतीवर मोठमोठाली झाडे, झुडपे असून त्यामुळे तलावाच्या भिंतीला धोका निर्माण होण्याची शक्यता असुन सुद्धा त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे.संबधित प्रकरणात लेखी तक्रार करूनही पाटबंधारे विभागाकडून याकडे दुर्लक्ष होत आहे. भविष्यात पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी पाणीसाठा सुरक्षित केला असुन अवैध पाणी उपसा करण्यात येऊ नये यासाठी महसूल, पाटबंधारे, महावितरण तसेच स्थानिक कर्मचारी यांना जिल्हाप्रशासनाने सुचना दिल्या असुन विद्युत पुरवठा खंडित करण्याचे तसेच विद्युत मोटारी जप्त करण्याचे आदेश दिले आहेत.तहसिलदार यांच्या मार्गदर्शनाखाली संयुक्त पथके पाणी साठ्याची पाहणी करत असताना साठवण तलावाच्या भिंतीवरील झाडाझुडुपांकडे मात्र कानाडोळा करत असल्याचे दिसून येत आहे.

## सूर्या सौंदळे, सानवी सौंदळेसह सब ज्युनिअर संघास सुवर्णपदक

परळी । प्रतिनिधी

पंचम ज्योतीर्लिंग वैद्यनाथाच्या परळी नगरीतील सूर्या सचिन सौंदळे याने जम्मू-कश्मीर येथील राष्ट्रीय एरोबिक जिम्नॅस्टिक स्पर्धेत नॅशनल डेव्हलपमेंट (९ ते११वर्षे) वैयक्तिक गटातून सुवर्णपदक व त्याशिवाय मिश्र तिहिरी चे रौप्य पदक पटकावले तर त्याचीच ज्येष्ठ भगिणी सानवी सौंदळे हीने सब ज्युनिअर गटात यश मिळवत सुवर्ण पदक प्राप्त केले आहे. सूर्या व सानवी सख्खे भाऊ-बहीण यांच्या दैदीप्यमान यशामुळे परळी शहराचेच नव्हे तर संपूर्ण बीड जिल्हा,मराठवाडा प्रदेश व महाराष्ट्र राज्याचे नांव उज्वल केले आहे. सूर्या-सानवी परळी-वैजनाथ येथील ज्येष्ठ पत्रकार तथा समुपदेशक जी.एस.सौंदळे (गुरूजी) यांची नातू-नात असून,राष्ट्रसंत डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराज तपोनुष्ठान समिती परळीचे अध्यक्ष तथा नगरसेवक चेतन सौंदळे यांचे पुतणे आहेत.

राष्ट्रीय एरोबिक जिम्नॅस्टीक स्पर्धा मौलाना आझाद(एम ए) स्टेडीअम जम्मू-कश्मीर येथे दि.२२ ते २४ मार्च २०२४ दरम्यान आयोजित करण्यात आल्या होत्या. या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र राज्यातून तसेच छत्रपती संभाजी नगरच्या खेळाडूंसह देशातील विविध राज्यातून एरोबिक




जिम्नॅस्टिक खेळाडूंची निवड करण्यात आली होती. सदरील स्पर्धेत राष्ट्रीय डेव्हलपमेंट गटातून चि.सूर्या सौंदळे याने व्यक्तिक गटातून सुवर्णपदक प्राप्त केले तर ट्रिओ गटातून रौप्य पदक पटकावले तसेच कु.सानवी सौंदळे हीने ईतर खेळाडूंसह सब ज्युनि्अर गटातील जम्मू-कश्मीर येथील राष्ट्रीय जिम्नॅस्टिक स्पर्धेत सुवर्ण पदक प्राप्त केले आहे. भारत देशाच्या विविध राज्यातील खेळाडूंसह महाराष्ट्राचा संघ नॅशनल डेव्हलपमेंट ग्रुप,सब ज्युनिअर,ज्युनिअर, सिनीअर,अशा चार वयोगटात पुरूष एकेरी,महिला एकेरी,मिश्र दुहेरी,असे संघ दाखल झाले होते.जम्मू-कश्मीर येथे पार पडलेल्या राष्ट्रीय जिम्नॅस्टीक स्पर्धेतून मे महीण्यात होणा-या सुझुकी वर्लडकप,जपान व एरोबिक जिम्नॅस्टीक्स एशियन चॅम्पिअनशिप, व्हितनाम या दोन आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी भारतीय संघाची निवड होणार आहे.

## झाडे जोपासने जलसंवर्धनासाठीचा उत्तम पर्याय-डॉ.आदिती सारडा

बीड । प्रतिनिधी

संपूर्ण जग हे पाण्यावर अवलंबून आहे. पाण्याची बचत आणि पाण्याचा योग्य तो वापर प्रत्येकांनी केलाच पाहीजे. पाणी निर्मितीसाठी प्रत्येकाने योग्य ती ठोस पावले उचलणे आवश्यक आहे. बदलते हवामान पाहता जास्तीत जास्त झाडांची संख्या आपल्या अवतीभोवती वाढवणे आणि त्यांची जोपासना करणे हाच एक जलसंवर्धनासाठीचा उत्तम पर्याय ठरणार आहे. असल्याचे आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका तथा वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या डॉ. आदिती सारडा म्हणाल्या.

आदित्य कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय आणि आदित्य अन्न तंत्र महाविद्यालय बीड येथे जागतिक जल दिवस आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक मा. सुभाषचंद्र सारडा यांच्या ठरवून दिलेल्या उद्धिष्टाप्रमाणे व डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला.




यावेळी प्राचार्य अमोल सानप, प्राचार्य श्याम भुतडा यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलतांना सारडा म्हणाल्या की, भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी तसेच वृक्ष लागवडीसाठी योग्य ते उपक्रम आदित्य शिक्षण संस्था येत्या काळात राबवेल. असे आश्वासन डॉ. आदिती सारडा यांनी विद्यार्थ्यांना दिले. जल संवर्धन जनजागृतीसाठी आदित्य कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, आदित्य अन्न तंत्र महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थीनी रॅली काढत पाण्याचे महत्व पटऊन दिले. प्राचार्य श्याम भुतडा म्हणाले की, पृथ्वीच्या भूगर्भातील पाण्याची पातळी दिवसेंदिवस खालावत चाललेली आहे. दक्षिण आफ्रिकेची राजधानी केपटाऊन हे शहर जगातील पहिले पाणी नसलेले शहर बनलेले आहे. संपूर्ण भारत देशामध्ये साधारण ६३% इतका तरुण वर्ग असून सध्याचा तरुण वर्ग हा जल संवर्धनासाठी उपयुक्त ठरू शकतो. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या वाढदिवशी कमीत कमी एक तरी झाड लावावे असे अवाहन भुतडा यांनी केले. एक कडुनिंबाचे झाड दहा हजार लिटर तर एक वटवृक्षाचे झाड पूर्ण सीझनमध्ये साधारणतः एक कोटी लिटर पाणी जमिनीमध्ये घेऊन जाऊ शकते.

## स्व. प्रवीण सोनवणे यांच्या कुटुंबियांचे डॉ.ज्योती मेटे यांच्याकडून सांत्वन

### बीड जिल्ह्यात प्रवेश होताच सामाजिक जाणीव

कडा । प्रतिनिधी

ना कुठे गाजावाजा ना कुठे सत्कार, ना कुठे हारतुरे स्विकारत किंवा कोणत्याही प्रकारचा बडेजावपणा न करता आज डॉ.ज्योती विनायकराव मेटे यांनी थेट मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून आत्मबलिदान दिलेल्या कुटुंबाच्या घरी भेट देऊन सांत्वन केले.

मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मागील अनेक दिवसांपासून लढ्यात सहभागी असलेल्या उच्च शिक्षित प्रविणने बेरोजगारीला कंटाळून व उच्च शिक्षण पूर्ण करून सुद्धा कोणत्याही प्रकारची नोकरी मिळाली नाही तसेच शासकीय स्तरावर आपली कुणबीची नोंद न सापडल्याने व सगेसोयरे ची अंमलबजावणी होत नसल्याने आपल्याला आरक्षण मिळनार नाही या नैराश्यातुन दि.१७ रविवारी पहाटेच्या सुमारास आपल्या व्हॉटसपवर मराठा आरक्षण संदर्भात स्टेटस ठेऊन गळफास घेऊन आत्मबलिदान देऊन जीवन संपविल्याची घटना नुकतीच घडली होती. प्रवीण दिलीप सोनवणे



असे आत्महत्या केलेल्या तरूणाचे नाव आहे. या विषयी सविस्तर माहिती अशी,आष्टी तालुक्यातील शेरी बुद्रुक (कडा) ता.आष्टी येथील तरूण प्रवीण दिलीप सोनवणे हा उच्च शिक्षित तरुणांने मराठा समाजाला आरक्षण मिळत नसल्याने नैराश्यातुन आत्मबलिदान दिले होते, प्रवीण हा नेहमी मराठा आंदोलक मनोज जरांगे याच्या समर्थनार्थ राज्यातील विविध भागात अनेक ठिकाणी उपस्थित होत असे. मराठा समाजाने एवढा मोठा लढा उभारून देखील आपल्या समाजाला आरक्षण मिळत नसल्याने त्याने रविवारी मोबाईलवर एक मराठा लाख मराठा व आरक्षण संदर्भात स्टेटस ठेऊन गळफास घेऊन जिवनयात्रा संपविल्याची दुर्दैवी घटना घडली होती ह्याची माहीती कळताच डॉ.ज्योती विनायकराव मेटे यांनी आत्महत्या ग्रस्त कुटुंबास भेट देऊन सांत्वन केले व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करत असताना काही अडचण आल्यास मला सांगा असे शेवटी डॉ.ज्योती मेटे यांनी सांगितले.

## शरिरासाठी प्रपंच तर मनाच्या शुद्धतेसाठी परमार्थ असतो- बोधले महाराज

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. महाराष्ट्राइतके संत इतर कुठल्याही भूमीमध्ये आढळत नाहीत. त्यामुळे महाराष्ट्र नेहमीच प्रत्येक गोष्टीवर आघाडीवर आहे. धार्मिक क्षेत्रामध्येसुद्धा महाराष्ट्राने आघाडी मारलेले आहे. ज्या भागात जी गोष्ट जास्त उपलब्ध असते त्या गोष्टीवरून तो भाग ओळखला जातो. महाराष्ट्राची ओळख म्हणजे संत परंपरा आहे. महाराष्ट्रातील असा एकही भाग नाही की जेथे संत नाहीत. माणसाच्या मनातील विषयवासना समूळ नष्ट करायच्या असतील तर संत साहित्याचा आधार घेऊन संत वचनाप्रमाणे प्रत्यक्ष वागलं पाहिजे. प्रत्येक संत वचनाला, संताच्या पायाखालील धूळ कण म्हणतात. संसार किंवा प्रपंच हा शरीरधर्मासाठी असतो तर परमार्थ हा मनाच्या शुद्धतेकरता असतो. दोन्हीमध्ये गफलता न करता संत वचनाच्या सानिध्यात राहून स्वतःचे कल्याण साधावे असे प्रतिपादन अखिल भारतीय वारकरी महामंडळाचे अध्यक्ष, ज्येष्ठ कीर्तनकार ह.भ.प. प्रकाश महाराज बोधले यांनी केले. तळेगाव येथील जगद्गुरु तुकोबाराय सेवापीठ येथे सुरू असणाऱ्या बीज उत्सवानिमित्त सहाव्या दिवसाच्या कीर्तनसेवेत ते बोलत होते. कीर्तनासाठी त्यांनी संत तुकाराम महाराजांचा 'संत चरणरज लागता



सहज वासनेचे बीज जळून जाय' हा अभंग निवडला होता. अत्यंत ओघवत्या शैलीमध्ये व ग्रामीण भाषेमध्ये त्यांनी उपस्थितांना प्रबोधित केले. संत साहित्याचे अनेक अर्थ असतात त्यामुळे फक्त शब्दावर न जाता त्याचा नीट भाव समजून घेतला पाहिजे असेही ते पुढे म्हणाले. या कीर्तनासाठी सेवापिठाचे संस्थापक परशुराम महाराज मराडे, गो.गो. मिसाळ, बंडू महाराज जटाळ, बहिर महाराज, त्रिंबक महाराज मातकर, गोकुळ महाराज उबाळे, दिगंबर महाराज पांडुळे, गोरे महाराज, राजाराम महाराज घोलप, श्रीकृष्ण उबाळे, सुधाकर शिंदे, रामेश्वर जाधव यांच्यासह तळेगाव, बीड, काकडहिरा, च-हाटा, जाधववाडी या गावासह पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जल पुनर्भरण कार्याबद्दल मधुकर वाघ 'मातृभूमी'कडून सन्मानित



बीड । प्रतिनिधी

पावसाचे पाणी बोअरवेलमध्ये साठवून पाणीटंचाई काळामध्ये पावसाच्या पाण्याचा योग्य वापर करता यावा यासाठी गेली ५ वर्षापासून शहरात तसेच जिल्ह्यातील नागरिकांना जल पुनर्भरणाविषयी जनजागृती करणारे महाराष्ट्र राज्य जीवन प्राधिकरण, बीडचे सेवानिवृत्त शाखा अभियंता मधुकर सदाशिव वाघ यांचा जागतिक जलदिनाचे औचित्य साधून दि.२३ मार्च २०२४ रोजी मातृभूमी प्रतिष्ठाणच्या वतीने सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देवून प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा यशदाचे प्रविण प्रशिक्षक डॉ.संजय तांदळे यांनी सत्कार केला.

आतापर्यंत शेकडो बोअरवेलला बोअर पुनर्भरणाचे मार्गदर्शन करुन मधुकर वाघ यांनी बोअरवेलला पाणी स्थिर ठेवण्यास सहकार्य केलेले आहे. शहरातील डॉ.संजय तांदळे व गोरख तळेकर यांच्या बोअरवेलला पुनर्भरणासाठी योग्य मार्गदर्शन त्यांनी केले त्याबद्दल त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.यावेळी सतिश जायभाये, विष्णु पन्हाळकर, राजेंद्र ढेंगे, ॲड.राजकुमार राऊत, गोरख तळेकर आदींची उपस्थिती होती.

## मनुष्याच्या प्रगतीसाठी धम्मसंस्कृतिचे पालन करा - भिक्खु धम्मशिल थेरो

बीड । प्रतिनिधी

फाल्गुन पौर्णिमेनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी संस्थेचे सचिव पुज्य भंते धम्मशिल थेरो यांनी सांगितले की,प्रत्येक व्यक्तीने वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून आपली मुले मुली संस्कारीत करणे गरजेचे आहे.त्याचबरोबर धम्मसंस्कृती जोपासतांना वेळेचं भान असावं असेही त्यांनी सांगितले.आजची पिढी मोबाईलमुळे भरकटत आहे.अशी खंत व्यक्त करुन पालकांनी आपल्या मुला-मुलीकडे वेळीच लक्ष देण्याची गरज आहे असा सल्लाही त्यांनी यावेळी दिला. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. शरद सदाफुले (र.भ.अट्टल महाविद्यालय,गेवराई)यांनी आपल्या खास शैलीत सामाजाची दशा व दिशा या विषयी आपल्या मार्मिक कथेच्या माध्यमातून मांडणी केली. यावेळी इंजि.संदीप औताने यांनी सांगितले की,बाबासाहेबांनी आम्हाला स्वाभिमान दिला.तोच स्वाभिमान




जतन करुन पुढच्या पिढीसाठी आदर्श निर्माण केला पाहिजे असे सांगितले.

महाराष्ट्र शासणाने अभियंता या पदासाठी घेतलेल्या परीक्षेत इंजि.अभिनव भिमज्ञ वेडे यांची सार्वजनिक बांधकाम विभाग लातूर येथे अभियंता म्हणून निवड झाल्यामुळे त्यांच्या सत्काराचेही आयोजन करण्यात आले होते. यावेळी दहा दिवस केशवपन करुन भिक्षुणी म्हणून अनुभव घेतलेल्या आयु.सोनाली संदीप गायकवाड यांचाही सत्कार करण्यात आला. भोजन दान दाते आयु.निता भोसले व परिवाराचे अभिनंदन करून सत्कार करण्यात आला. सर्व प्रथम भंते भिक्खु धम्मशिल थेरो व भिक्खु धम्मसेवक यांच्या हस्ते महापुरुषांची पुष्प पुजा करण्यात आली.क्षमा-शिल-याचनेनंतर त्रिसरण -पंचशील व बुध्द पुजा वंदना घेण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डा.नामदेव शिनगारे यांनी केले तर तर आभार आयु.भास्कर सरपते यांनी मानले.या कार्यक्रमाला प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्थेचे सर्व सदस्य व पंचक्रोशितील उपासक, उपासिका बहूसंख्येने उपस्थित होते.

## श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान ते श्रीक्षेत्र पैठण पायी दिंडी सोहळ्याचे लिंबागणेश येथे जल्लोषात स्वागत

लिंबागणेश । प्रतिनिधी

संत एकनाथ महाराज षष्ठी सोहळा प्रित्यर्थ सालाबादप्रमाणे यावर्षी बीड तालुक्यातील बेलगाव येथील श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थानची श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान ते श्रीक्षेत्र पैठण पायी दिंडी सोहळ्याचे मठाधिपती श्री.ह.भ.प.महंत महादेव बाबा भारती आणि श्री.ह.भ.प.शांतीब्रम्ह तुकाराम महाराज भारती यांच्या मार्गदर्शनाखाली काल दि.२५ सोमवार रोजी सकाळी श्रीक्षेत्र बेलेश्वर व श्रीगुरू ईश्वर बाबा भारती यांचा अभिषेक करुन प्रस्थान झाले.पायी दिंडीचे १० वे वर्ष असून मोठ्या संख्येने भाविक यात सहभागी झाले होते.

बेलगाव ते मुळुकवाडी मार्गे ईश्वरभारती बाबांच्या जन्मगावी लिंबागणेश या ठिकाणी दिंडीचे मुख्य प्रवेशद्वारावर आतिषबाजी करुन फुलांनी सजवलेल्या आकर्षक रथामध्ये विराजमान महंत महादेव भारती व महंत तुकाराम भारती महाराज यांचे शाल श्रीफळ, पुष्पहार घालून स्वागत करत सवाद्य बँड बाजा



पथकासह भाविकांनी मिरवणूक काढली.यावेळी सुवासिनींनी पाद्यपुजन करत ओवाळले. स्वागतासाठी सरपंच बालासाहेब जाधव, उपसरपंच बाळकृष्ण थोरात, दामु थोरात, पांडुरंग वाणी, विक्रांत वाणी, संतोष वाणी, अर्जुन घोलप, बाबु वाणी, शिवहारी कोटुळे, गणपत तागड, भगवान मोरे, अँड.गणेश वाणी व,अनंतकाका मुळे,गणपत घोलप,दशरथ दशमे,विनायक वाणी,प्रकाश वायभट, विश्वंभर गिरी,आदि भाविक उपस्थित होते.बेलेश्वर मंदिराच्या ठिकाणी ग्रामस्थांच्या वतीने चहा,नाष्टा पाण्याची सोय करण्यात आली होती. पायी दिंडी सोहळा दि.२५ मार्च ते २ एप्रिल दरम्यान होत असुन पायी दिंडीचा बेलखंडी,बेलुरा र,फुलसांगवी,अर्धपिंपरी,मुंगी, पैठण याठिकाणाहुन प्रवास होऊन पायी दिंडी दि.१ एप्रिल रोजी पैठण येथे मुक्कामी पोहोचणार आहे. दि.२ एप्रिल रोजी ह.भ.प. शांती ब्रम्ह तुकाराम महाराज भारती यांच्या काल्याच्या किर्तनाने सांगता होणार आहे. नाथषष्ठी सोहळ्यांमध्ये भजन किर्तन क ,भारुड संगीत भजन आदि कार्यक्रम संपन्न होतात.जेवणाची आणि राहण्याची मोफत व्यवस्था संस्थानच्या वतीने केली जाते.

शांती ब्रम्ह तुकाराम महाराजांच्या अथक प्रयत्नांमुळे पंचक्रोशीतील भाविक पायी दिंडी सोहळ्यात मोठ्या प्रमाणावर सहभागी होत आहेत.याबद्दल सरपंच बालासाहेब जाधव , डॉ.गणेश ढवळे, हरिओम क्षीरसागर, विक्रांत वाणी यांनी महंतांचे आभार मानले.यावेळी नेकनुर पोलिस स्टेशनचे उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे,लिंबागणेश पोलिस चौकीचे पो.हे बाबासाहेब डोंगरे , ढाकणे आदी हजर होते.

## नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे -युसूफ़

### कॅनॉल चौकातही आचारसंहितेची अंमलबजावणी; ती मशालही झाकली

बीड । प्रतिनिधी

शहरातील मल्टीपर्पज मैदानानंतर कॅनॉल चौकातही आचारसंहितेची अंमलबजावणी करण्यात आली असून ती मशालही झाकण्यात आली आहे. यामुळे प्रशासन अलर्ट असेल तर शासन कसे गतिमान करता येते याची चुणूक सध्या बीड शहरात दिसून येत असून नागरिकांनीही प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, सध्या आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लावण्यात आलेली आदर्श आचारसंहिता देशभरात लागू आहे. या अनुषंगाने अनेक पथ्य पाळावे लागत आहे. तरीही कुठे ना कुठे काही ना काही राहुन किंवा सुटून जाते. अशाच प्रकारे बीड शहरातील मुख्य चौकांपैकी एक असलेला तुळजाई कॅनॉल चौक आहे. जिथे हातात धगधगती मशालची प्रतिकृती बीड नगर परिषदेकडून लावण्यात आलेली आहे. मशाल हे चिन्ह या लोकसभेच्या निवडणुकीत एका राजकीय



पक्षाचे असणार आहे. यामुळे या मशालीकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी 'आचारसंहितेतही ही मशाल सताड उघडी; तिला झाका' या शीर्षकाने बातमी प्रकाशित केली होती. ही बातमी प्रकाशित होताच जिल्हा प्रशासनाने दखल घेऊन ही मशाल झाकून दोरीने बांधून टाकली. यामुळे आदर्श आचारसंहितेचे पालन तर झालेच शिवाय प्रशासन अलर्ट असले तर शासन कसे गतिमान करता येते याचा अनुभव बीड शहरवासीयांना आला असून प्रशासनाकडून चांगले काम करून घेण्यासाठी नागरिकांनीही प्रशासनास सहकार्य करावे. असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.

# सातार्‍यात भाजपकडून उदयनराजेंनाच तिकीट

## लवकरच अधिकृत घोषणा, विद्यमान खासदाराचा दावा

**सातारा । प्रतिनिधी**

गेल्या अनेक दिवसांपासून सातार्‍याच्या जागेवरुन महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये खलबतं सुरू आहेत. अशातच आता सातार्‍याबाबत एक मोठी बातमी समोर येत आहे. सातारा लोकसभेसाठी छत्रपती उदयनराजे भोसले यांची भाजपकडून उमेदवारी निश्‍चित करण्यात आली आहे. अशी माहिती भाजपचे विद्यमान खासदार रणजीत नाईक निंबाळकर ( – यांनी दिली आहे. उदयनराजेंची उमेदवारी निश्‍चित करण्यात आली असून उद्याच घोषणा होण्याची शक्यता असल्याची माहितीही रणजीत नाईक निंबाळकरांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे. दरम्यान, भाजप नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांसोबत झालेल्या भेटीनंतर निंबाळकरांनी ही माहिती दिली आहे.

भाजपचे विद्यमान खासदार रणजीत नाईक निंबाळकर बोलताना म्हणाले की, ‘‘सातारा लोकसभेसाठी छत्रपती उदयनराजे भोसले यांची भाजपकडून उमेदवारी



निश्‍चित करण्यात आली आहे. उद्या घोषणा होण्याची शक्यता आहे. पश्‍चिम महाराष्ट्र महायुतीच्या प्रचाराचा नारळ माढा लोकसभेतील माळशिरस येथे फुटणार आहे.‘‘ तसेच, यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार आणि सर्व सहयोगी पक्षाचे नेते उपस्थित राहणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. यानंतर उपमुख्यमंत्री आपले कुलदैवत असणार्‍या निरा नरसिंहपूर येथे जावून नरसिंहाचं दर्शन घेणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

### सातार्‍यात झळकले उदयनराजेंचे पोस्टर्स

उद्या उदयनराजेंचा सातार्‍यात भव्य स्वागत सोहळा पार पडणार आहे. शिरवळपासून सातार्‍यात ठिकठिकाणी स्वागत केलं जाणार आहे. अद्याप उदयनराजेंना पक्षाकडून उमेदवारी जाहीर करण्यात आलेली नाही. अशातच तिकीट जाहिर होण्या आगोदरच उदयनराजेंच्या स्वागताची जय्यत तयारी सुरू आहे. यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे. भाजपकडून ग्रीन सिग्नल मिळाल्याची माहिती मिळाली असल्याचं कार्यकर्त्यांचं म्हणणं आहे.

### सातारा सोडतो, नाशिक आम्हाला द्या; अजित पवार गटाची मागणी

सातार्‍यात उद्या उदयनराजेंचा भव्य सत्कार केला जाणार आहे, असे पोस्टर्स फिरू लागले आहेत. तर दुसरीकडे राष्ट्रवादीला बारामती, रायगड, शिरूर, नाशिक आणि परभणी या पाच जागा मिळणार अशी माहिती मिळत आहे. म्हणूनच, राष्ट्रवादीने सातार्‍यावरील आग्रह सोडला का? असा प्रश्‍न निर्माण होत आहे. दुसरीकडे सातारा लोकसभा भाजपला सुटत असेल तर बदल्यात नाशिक आम्हाला सोडा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस भाजपकडे करत असल्याचंही समोर आलं आहे. नाशिक लोकसभेत भाजपचे तीन आमदार आहेत. राष्ट्रवादीचे दोन आमदार तर काँग्रेसचा एक आमदार आहे. त्यामुळे ही जागा आम्हाला मिळाली पाहिजे, अशी भाजपची मागणी आहे. दुसरीकडे सातारा लोकसभा भाजपला सुटत असेल तर बदल्यात नाशिक आम्हाला सोडा, अशी राष्ट्रवादीची भूमिका आहे. यामध्ये एकनाथ शिंदेंची मात्र मोठी अडचण झाली आहे. नाशिकमध्ये तुमची ताकद नाही त्यामुळे ती जागा आम्हाला सोडा अशी भाजप आणि राष्ट्रवादीची भूमिका आहे. पण हेमंत गोडसे हे शिवसेनेचे विद्यमान खासदार असताना आम्ही नाशिक लोकसभा सोडणार नाही, अशी शिंदेंची भूमिका आहे.

# परभणी मतदारसंघात महादेव जानकर लागले कामाला

## प्रचारासाठी जाताना परळीत प्रज्ञाताई मुंडे यांचे घेतले आशिर्वाद

**परळी । प्रतिनिधी**

देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्यानंतर महादेव जानकर यांनी आपण महायुतीतच राहणार असल्याचे सांगितल्यावर परभणी लोकसभा मतदार संघात ते आता कामाला लागले आहेत. प्रचारासाठी जात असताना मंगळवारी जानकर यांनी परळीत यशश्री निवासस्थानी जावून गोपीनाथ मुंडे यांच्या पत्नी प्रज्ञाताई मुंडे यांचे आशिर्वाद घेतले. त्यानंतर ते परभणीकडे प्रचारासाठी निघाले.



महादेव जानकर हे २००९ पासून गोपीनाथ मुंडे यांच्या अत्यंत जवळ आले. मुंडे यांनी पुढे त्यांना २०१४ मध्ये मानसपुत्रही म्हणून जाहीर केले. सावली प्रमाणे जानकरही मुंडे यांच्या पश्चात त्यांच्या दोन्ही कन्यांच्या पाठीशी भावासारखे राहिले. पंकजा मुंडे यांच्या प्रमाणेच त्यांच्याकडेही भाजप नेतृत्वाने दुर्लक्ष केले. गेल्या पाच वर्षात महादेव जानकर हे सुध्दा राजकीय वनवासातच होते. त्यातच यंदाच्या लोकसभा निवडणुकीत महायुतीकडून योग्य प्रतिसाद मिळत नसल्याने त्यांनी महाविकास आघाडीकडे जाण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार शरद पवार यांची त्यांनी पुणे येथे भेटीही घेतली. याच दरम्यान महादेव जानकर यांचे महत्व भाजप नेतृत्वाला कळले असल्याने देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना सागर बंगल्यावर बोलावले. चर्चा समाधानकारक झाल्याने व परभणी लोकसभा रासपसाठी सोडल्याने जानकर यांनी आपण महायुतीतच असल्याचे जाहीर केले. मंगळवारी परभणी येथे प्रचारासाठी जाताना महादेव जानकर यांनी परळी येथे यशश्री बंगल्यावर जावून प्रज्ञाताई मुंडे यांचे आशिर्वाद घेतल्यानंतर ते परभणीकडे प्रचारासाठी निघाले. प्रज्ञाताई यांनी आशिर्वाद दिल्याने आता परभणीमधून महादेव जानकर विजयी होतील, असा विश्‍वास त्यांच्या समर्थकांना असून बीडमधून पंकजा मुंडे तर परभणीमधून महादेव जानकर हे दोघेही दिल्लीला जाणार असल्याचे आता निश्‍चित झाले आहे.

# नागपूर, रामटेक महायुती नामांकन

## आज शक्तिप्रदर्शन, मुख्यमंत्री- उपमुख्यमंत्री येणार

**नागपूर । प्रतिनिधी**

नागपूर लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, रामटेक लोकसभा मतदार संघाचे उमेदवार राजू पारवे आज बुधवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. मंगळवारी काँग्रेसचे उमेदवार विकास ठाकरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. यानिमित्ताने कधी नव्हे ते काँग्रेस नेत्यांचे एकजुटीचे आणि हजारो कार्यकर्त्यांचे शक्तिप्रदर्शन पहायला मिळाले.



रामटेक लोकसभा मतदारसंघातील माजी मंत्री सुनील केदार गटाच्या काँग्रेस उमेदवार रश्मी बर्वे या देखील बुधवारी नामांकन दाखल करणार आहेत. दरम्यान, यावेळी भाजप-शिवसेना महायुतीचे शक्तीप्रदर्शन पाहायला मिळणार आहे. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची उपस्थिती राहणार आहे. यासोबत पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे नेते प्रा. जोगेंद्र कवाडे, माजी राज्यमंत्री श्रीमती सुलेखाताई कुंभारे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार गट) नेते प्रशांत पवार, लोक जनशक्ती पार्टीचे विदर्भ प्रदेश अध्यक्ष सतीश लोणारे उपस्थित राहणार आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयात अर्ज दाखल करण्यापूर्वी नितीन गडकरी संविधान चौकात सकाळी ९.३० वाजता महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बख्त बुलंद शहा चौकात गोंड राजे बख्त बुलंद शाह यांच्या पुतळ्याला अभिवादन केल्यानंतर ते जिल्हाधिकारी कार्यालयाकडे रवाना होणार आहेत.

# आंबेडकरांच्या प्रस्तावासाठी काँग्रेसचे एक पाऊल पुढे - नाना पटोले

**नागपूर । प्रतिनिधी**

महाविकास आघाडीच्या जागा वाटपात दोन जागांवर अजून निर्णय झालेला नाही, त्यावर चर्चेतून लवकरच मार्ग निघेल. आघाडीचा धर्म सर्वांनीच पाळला पाहिजे. सांगली व भिवंडी या काँग्रेसच्या परंपरागत जागा आहेत, या जागांवर काँग्रेस पक्षाकडे चांगले उमेदवार आहेत. सांगलीत जे झाले ते बरोबर झाले नाही असे म्हणत वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांच्या प्रस्तावासाठी काँग्रेसने एक पाऊल पुढे टाकले आहे, आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या मित्र पक्षांनीही तो प्रस्ताव मान्य करावा, असे आवाहन काँग्रेस काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केले.



नागपूर येथे प्रसार माध्यमांशी बोलताना नाना पटोले म्हणाले की, देशाचे संविधान व लोकशाही टिकवणे हे सर्वांचे काम आहे. आताची निवडणूक ही देश वाचवण्यासाठी आहे. भाजपाचा पराभव करणे हाच मुख्य उद्देश आहे. महाविकास आघाडी या लोकसभा निवडणुकीत भाजपाचा दारूण पराभव करेल. मागील १० वर्षात भाजपाने खोटी आश्‍वासने देऊन देशाला बरबाद केले, त्याचा उगम हा नागपुरच आहे. महागाई, बेरोजगारी प्रचंड वाढलेली आहे, शेतकर्‍याला उद्ध्वस्त केले आहे. देशावर कर्जाचा मोठा डोंगर करून ठेवला आहे. जनतेमध्ये मोदी सरकारविरोधात प्रचंड असंतोष आहे. त्यामुळे मोदी सरकारला धडा शिकवल्याशिवाय जनता गप्प बसणार नाही असा गर्भित इशाराही यावेळी दिला. पुढे बोलताना नाना पटोले म्हणाले की, नागपूरमध्ये भाजपाचा उमेदवार कोण आहे हे महत्वाचे नाही. ही लढाई विचाराची आहे. हायवे मॅन चित्रपट फ्लॉप झाला, मोदींवर काढलेला चित्रपटही फ्लॉप झाला, पण मुन्नाभाई एमबीबीएस चित्रपट मात्र सुपरहिट झाला होता. आज जनतेला गांधी विचाराची आवश्यकता आहे. विकासाच्या नावाखाली नागपूरचे बेहाल करुन ठेवले आहेत. नेमका कोणाचा विकास झाला? कुठे गेले मिहान? मालवाहतुक करणारी विमाने उतरतील आणि शेतकर्‍यांना फायदा होईल, या आश्‍वासनांचे काय झाले असा सवालांचा भडिमार करत नागपूर शहरात सिमेंटचे रस्ते बनवले आहेत, आधीच नागपुरात जास्त तपमान व आता सिमेंटचे रस्ते यामुळे तापमान आणखी वाढणारच. स्थानिक मुद्द्यांबरोबरच राष्ट्रीय मुद्द्यांवरही या निवडणुकीत भर दिला जाणार आहे. काँग्रेस पक्षात एकजूट असून नागपूरमधून काँग्रेस व महाविकास आघाडीचा उमेदवार २.५ लाख मताधिक्क्याने विजयी होईल, असा विश्‍वास यावेळी व्यक्त केला. महाविकास आघाडीच्या विकास ठाकरे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी सकाळी व्हरायटी चौकातील गांधी पुतळ्याला आदरांजली अर्पण करण्यात आली व नंतर अर्ज दाखल करण्यात आला. विकास ठाकरे यांचा अर्ज दाखल करतेवेळी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी मंत्री अनिल देशमुख, माजी मंत्री सुनिल केदार, माजी केंद्रीय मंत्री विलास मुत्तेमवार, माजी मंत्री सतिश चतुर्वेदी, अनिस अहमद, आ.अभिजीत वंजारी, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव रामकिसन ओझा, प्रफुल्ल गुडधे यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पहिल्या टप्प्यात विदर्भातील पाच लोकसभा मतदारसंघात ४० जणांचे उमेदवारी अर्ज दाखल

## अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस, १९ एप्रीलला मतदान

**नागपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात पाच टप्प्यात निवडणूका पार पडणार आहेत. त्यातील १९ एप्रिल २०२४ रोजी पहिल्या टप्प्यातील मतदान पार पडणार आहे. या पहिल्या टप्प्यात विदर्भातील पाच लोकसभा मतदारसंघात निवडणूक पार पडणार आहे. त्याचबरोबर या पाच जागांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत २७ मार्च २०२४ अखेरची आहे. मंगळवार अखेर पर्यंत विदर्भातील पाच जिल्ह्यात ४० उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केल्याची माहिती मुख्याधिकारी निवडणूक आयोग महाराष्ट्रकडून देण्यात आली आहे.

महाराष्ट्रात पहिल्या टप्प्यात रामटेक, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर आणि चंद्रपूर या पाच मतदारसंघात निवडणूक पार पडणार आहे. यातील नागपूर लोकसभा मतदारसंघातून काँग्रेस उमेदवार विकास ठाकरे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. तर चंद्रपूर लोकसभा मतदारसंघातून भाजपाचे सुधीर मुनगंटीवार आणि गडचिरोली-चिमूर मतदार संघातून भाजपाचे विद्यमान खासदार अशोक नेते यांनी पुन्हा एकदा उमेदवारी अर्ज भरला आहे. नागपूरमधून भाजपाचे नितीन गडकरी हे बुधवारी अर्ज भरणार असल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, भारतीय जनता पार्टीचे चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार म्हणून सुधीर मुनगंटीवार यांनी मंगळवारी चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालयात आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज दाखल करण्यापूर्वी झालेल्या गांधी चौकातील विजय संकल्प सभेला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे,राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर, खा.रामदास तडस, आ.संदीप धुर्वे, आ.अशोक उईके, आशिष देशमुख तसेच भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी, रिपब्लिकन पक्षाचे स्थानिक नेते, पदाधिकारी उपस्थित होते. या सभेला देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे यांनी संबोधित केले. सभेनंतर गांधी चौक ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत मिरवणुकीने जात मुनगंटीवार यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदारसंघाचे भाजपा उमेदवार, विद्यमान खासदार अशोक नेते यांनीही मंगळवारी उमेदवारी अर्ज दाखल केला. त्या आधी झालेल्या विजय संकल्प सभेला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रवादीचे नेते, अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मराव बाबा अत्राम, आ. देवराव होळी, आ. बंटी भांगडिया, आ.कृष्णा गजबे, शिवसेना, रिपब्लिकन पक्ष व महायुतीच्या घटक पक्षांचे नेते, पदाधिकारी उपस्थित होते.

# छगन भुजबळांचे राजकारण केंद्राकडे वळणार? ‘कमळ’ चिन्हावर लढण्याचा भाजपकडून प्रस्ताव

**नाशिक । प्रतिनिधी**

देशभरामध्ये लोकसभा निवडणूकीची जोरदार तयारी सुरु आहे. भाजपने काही उमेदवारांची नावे जाहीर देखील केली आहेत. मात्र काही जागांच्या उमेदवारांची चाचपणी अद्याप सुरु आहे. दरम्यान, नाशिकमधील लोकसभा जागेचा गुंता अद्याप महायुतीकडून सोडवण्यात आलेला नाही. त्यामध्येच आता अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ हे नाशिक लोकसभा मतदारसंघामध्ये उमेदवार म्हणून घोषित होणार असल्याच्या चर्चा रंगल्या आहेत. त्यामुळे



भुजबळ यांचे राजकारण राज्यातून केंद्राकडे वळणार आहे.

महायुतीमध्ये सातारा लोकसभेच्या जागेवरुन राष्ट्रवादी आणि भाजपमध्ये रस्सीखेच सुरू होती. सातार्‍यातून उदयनराजे भोसले यांना घड्याळ चिन्हावर लढवण्यास अजित पवार गट आग्रही होता. मात्र ही जागा भाजपकडेच राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. अशातच आता सातार्‍याऐवजी सध्या शिंदे गटाकडे असलेल्या नाशिकमधून राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ लढणार असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे राज्यातील राजकारणामध्ये बदल दिसणार असून भुजबळ हे आता केंद्राकडे वळणार असल्याचे बोलले जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते छगन भुजबळ हे महायुतीमधून लोकसभा लढवणार असल्याची शक्यता असून भुजबळ यांना नाशिक लोकसभेची उमेदवारी जवळपास निश्‍चित झाल्याचे मीडिया रिपोर्टमधून सांगितले जात आहे. . भारतीय जनता पक्षाने () छगन भुजबळ यांनी कमळ चिन्हावर निवडणूक लढवण्याचा प्रस्ताव दिला होता. मात्र अजित पवार यांनी भुजबळ पक्षाच्या चिन्हावर निवडणूक लढवण्याबाबत ठाम असल्याचे सांगण्यात येत आहे.

# लक्षद्वीपसाठी अजित पवार गटाची युसुफ टीपी यांना उमेदवारी

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने लक्षद्वीपच्या जागेवर युसुफ टीपी यांची उमेदवारी घोषित केली. महाराष्ट्र राज्याबाहेर लोकसभेची ही एकमेव जागा अजित पवार गट लढवत आहे. यापूर्वी २०१९ च्या लोकसभेला राष्ट्रवादीच्या वतीने ही जागा मोहम्मद फैजल यांनी जिंकली होती. मात्र राष्ट्रवादीत पडलेल्या फुटीनंतर फैजल यांनी शरद पवार गटात जाणे पसंत केले. या पार्श्‍वभुमीवर अजित पवार गटाने आपला उमेदवार या ठिकाणी दिला. त्यामुळे इथली लढत ही राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार अशी होण्याची दाट शक्यता आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट राज्याबाहेरही आपला विस्तार करण्याचा प्रयत्न करत आहे. याच रणनीतीचा भाग म्हणून अरुणाचल प्रदेशमधील विधानसभेच्या बहुतांश जागा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्यावतीने लढवल्या जात आहेत. तसेच मागील लोकसभा निवडणुकीच्या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसकडे असलेली लक्षद्वीपची जागाही अजित पवार लढवत आहे. अजित पवार गट महायुतीत असल्यामुळे स्वाभाविकच या ठिकाणी भाजपचा उमेदवार असणार नाही. शरद पवार गटाने अद्याप या ठिकाणी उमेदवारी घोषित केली नसली तरी पुन्हा एकदा मोहम्मद फैजल यांनाच उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे इथली लढत ही अजित पवार गट विरुद्ध शरद पवार गट अशीच होणार आहे.

# शिवाजी आढळराव-पाटील यांचा अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश

**पुणे । प्रतिनिधी**

शिरूर मतदार संघातील शिवसेनेचे माजी खासदार शिवाजी आढळराव-पाटील यांनी आज (दि.२६) अजित पवारांच्या राष्ट्रवादी पक्षात अधिकृतपणे प्रवेश केला. आढळराव-पाटील यांच्यासोबत त्यांच्या अनेक कार्यकर्त्यांनी देखील पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत मंचर (ता. आंबेगाव) येथील शिवगिरी मंगल कार्यालयात हा पक्ष प्रवेश पार पडला. यावेळी मोठ्या संख्येने शिवसेनेतील कार्यकर्ते राष्ट्रवादीत दाखल झाले. शिवाजी आढळराव- पाटील यांच्या पत्नी कल्पना आढळराव यांनीही अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला. यावेळी अजित पवारांसह सुनिल तटकरे, दिलीप वळसे पाटील, रुपाली चाकणकर, आमदार अतुल बेनके आदी नेते उपस्थित होते. शिरूर



लोकसभेतील मंचरमध्ये यासाठी सभेचे आयोजन करण्यात आले होते. शिरूर लोकसभेत शिवाजी आढळरावांना घड्याळ चिन्हावर उतरवले जात आहे. त्यांचा सामना शरद पवारांच्या राष्ट्रवादीतील अमोल कोल्हे यांच्याशी होणार आहे.

शिवाजी राव तुमचे आणि माझे आणखी नाते घट्ट झाले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने लोकसभेचा पहिला उमेदवार म्हणून माझी घोषणा केली. त्यानंतर मी थेट इथंच आलो. आता इथंच सांगतो शिवाजी आढळराव तुम्हाला आणि मला दिल्लीत एकत्र काम करायचे आहे, असे मत अजित पवार गटाचे नेते सुनील तटकरे यांनी व्यक्त केले. राज्यात स्वाभिमान कोणी जपला असेल तर ते अजित दादांनी जपला आहे, असा निशाणा जुन्नरचे आमदार अतुल बेनके यांनी शरद पवारांवर साधला. शिरुर लोकसभा मतदार संघातील जुन्नर, आंबेगाव, खेड तालुक्यातील आमदार दत्तात्रयांचे सुपुत्र! नव्याने पक्षात प्रवेश केलेल्या आढळराव-पाटील हे हि दत्तात्रय पुत्र आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे ही दत्तात्रय पुत्र. त्यामुळे आम्ही सर्व दत्तात्रय पुत्र नव्याने पक्षात आलेल्या आढळराव-पाटीलांच्या दत्तात्रय पुत्राला निवडुन आणुच असे आवाहनही बेनके यांनी त्यांच्या भाषणातून केले. समृद्ध आणि विकसित महाराष्ट्राच्या दैदिप्यमान उज्वल भविष्यासाठी आपण मशाल हाती घेऊयात. हा संकल्प हाती घेऊन आपण अजित दादांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहुयात, असे महिला आयोगाच्या अध्यक्षा आणि अजित पवार गटाच्या नेत्या रुपाली चाकणकर यांनी याप्रसंगी बोलताना स्पष्ट केले.

### माझं आढळरावांशी कोणतंही वैयक्तिक वैर नाही-मोहिते पाटील

मलाही शिवसेनेतून राष्ट्रवादीत अजित दादांनी आणले. घडाळाच्या चिन्हावर मी कसा उभा राहिलो, याची ही एक मोठी कथा आहे. हे सांगायला कोणा ज्योतिषाची गरज नाही. माझे दिलीप वळसे-पाटील आणि शिवाजी आढळरावांशी कोणतेही वैयक्तिक वैर नाही. भामा, आसखेड आणि कळंबोली धरणातील पाणी माझ्या तालुक्याला मिळावे, यासाठी माझा त्यांच्याशी संघर्ष सुरू होता. बोलल्याशिवाय काही मिळत नाही. मी बोलत होतो, त्यामुळ मतभेद दिसून आले. मात्र आता दिलीप वळसे आणि अजित दादांनी पाणी देतो, हे कबूल केलेल आहे. इतकीच माझी भूमिका होती. आता माझा प्रश्‍न सुटला त्यामुळं हा पुढचा (लोकसभेचा) प्रश्‍न ही सुटणार आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
बुधवार दि.२७ मार्च २०२४ । पान ७

# लोकसभा निवडणूक पूर्वपीठिकेचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांच्या हस्ते प्रकाशन

**पुणे । प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक- २०२४ च्या अनुषंगाने पुणे जिल्हा निवडणूक प्रशासनाच्यावतीने तयार करण्यात आलेल्या निवडणूक पूर्वपीठिकेचे प्रकाशन प्रधान सचिव तथा राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांच्या हस्ते यशदा येथे करण्यात आले.

यावेळी भारत निवडणूक आयोगाचे स्वीप संचालक संतोष अजमेरा, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, आयोगाच्या वरीष्ठ स्वीप सल्लागार अनुराधा शर्मा, उपजिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर आदी उपस्थित होते.

पुणे जिल्हा माहिती कार्यालयाने वृत्तपत्रे, इलेक्ट्रॉनिक



## माध्यमांना निवडणूक विषयक संदर्भासाठी पुस्तिका उपयुक्त

माध्यमे आदी प्रसिद्धी माध्यमांसाठी उपयुक्त संदर्भ असलेल्या या पुस्तिकेची निर्मिती केली आहे. निवडणूक आचारसंहितेबाबत तरतुदी, निवडणूक वार्तांकनासाठी प्रेस कौन्सिलची मार्गदर्शक तत्त्वे, न्यूज ब्रॉडकास्टर्स अँड डिजिटल स्टँडर्ड्स ऑथॉरिटीच्या (एनबीडीएसए) मार्गदर्शक सूचना, इंटरनेट अँड मोबाईल असोसिएशन ऑफ इंडियाची (आयएमएआय) स्वैच्छिक आचारसंहिता आदींबाबत सविस्तर माहिती या पुस्तिकेत दिली आहे. राजकीय जाहिरातींच्या प्रमाणीकरणासाठी माध्यम प्रमाणीकरण आणि संनियंत्रण समितीचे कामकाज (एमसीएमसी), पेड न्यूजबाबत तरतुदी आदी उपयुक्त माहिती या पुस्तिकेत देण्यात आली आहे. २०१९ च्या सार्वत्रिक निवडणुकीतील महाराष्ट्राची मतदानाबाबतची ठळक बाबी तसेच पुणे जिल्ह्यातील निवडणुकीची ठळक वैशिष्ट्ये यांचा पुस्तिकेत समावेश आहे. सन १९५१ च्या निवडणुकीपासून २०१९ च्या निवडणुकीपर्यंत जिल्ह्यातील लोकसभा मतदार संघातील उमेदवार त्यांना झालेले मतदान, मतदार संख्या, वैध मतांची संख्या, मतदानाची टक्केवारी यांचाही पुस्तिकेत समावेश असल्याने ही पुस्तिका माध्यम प्रतिनिधींना संदर्भासाठी उपयुक्त आहे. माध्यमांच्या माहितीसाठी जिल्ह्यातील चारही लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणुकीच्या अनुषंगाने विविध विषयांचे समन्वय अधिकारी यांचे दूरध्वनी क्रमांक, मतदार मदत कक्ष, जिल्हास्तरीय नियंत्रण कक्ष यांचे दूरध्वनी क्रमांक, आयोगाच्या विविध तंत्रज्ञान सहाय्यित उपयोजक (प), पोर्टल आदींची माहितीही यात देण्यात आली आहे.

# सराईत वाहन चोरटा दिघी पोलिसांकडून जेरबंद

**दिघी । प्रतिनिधी**

पोलिसांनी एका सराईत वाहन चोरट्याला अटक केली आहे. त्याच्या अल्पवयीन साथीदाराला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. दोघांकडून चार दुचाकी जप्त केल्या आहेत.

संतोष जयहिंद गुप्ता (वय १९, रा. भोसरी) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय ढमाळ यांनी दिलेल्या माहितीनुसार, धुलीवंदन सणानिमित्त गस्तीवर असलेल्या पोलिसांना एका दुचाकीवरून दोघेजण संशयितपणे जाताना दिसले. त्यामुळे पोलिसांनी त्यांना



थांबवण्याचा प्रयत्न केला असता ते पळून जाऊ लागले. पोलिसांनी त्यांचा पाठलाग करून ताब्यात घेतले. त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी दिघी आणि चाकण मधून चार दुचाकी चोरल्याचे निष्पन्न झाले.

दोघांकडून दोन लाख ८० हजार रुपये किमतीच्या चार दुचाकी जप्त केल्या आहेत. या कारवाईमुळे दिघी पोलीस ठाण्यातील तीन आणि चाकण पोलीस ठाण्यातील एक गुन्हा उघडकीस आला आहे.

## तरुणाच्या अंगावर ॲसिड सदृश रसायन फेकले सिंम्बॉयसिस बॉईज होस्टेलमधील घटना

पुणे : महाविद्यालयाच्या बॉईज हॉस्टेल मधील खोलीत झोपलेल्या तरुणाच्या अंगावर ॲसिडसदृश रसायन फेकण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना रेंजहिल खडकी येथील सिम्बॉयसिस बॉइज हॉस्टेलमध्ये २३ मार्च रोजी रात्री साडे आठ ते नऊ या दरम्यान घडली आहे.

याबाबत आशिषकुमार नरेंद्रकुमार दास (वय २४, रा. सिंबायोसिस बॉईज हॉस्टेल, रेंजहिल्स) याने खडकी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार अज्ञात आरोपीविरुद्ध भा.दं.वि. कलम ३२६ अ), ३४२, ४४८ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार तरुण रेंजहिल्स परिसरातील सिंबायोसिस बॉईज हॉस्टेलमध्ये राहायला आहे. शनिवारी (दि. २३) तो वसतिगृहातील खोलीत रात्री साडेआठच्या सुमारास झोपला होता.

त्यावेळी एकजण वसतिगृहातील खोलीचा दरवाजा उघडून खोलीत आला. त्याने ॲसिड सदृश रसायन प्लास्टिकच्या मगमध्ये भरले. झोपेत असलेल्या आशिषकुमार याच्या अंगावर मगमधील रसायन फेकून तो पसार झाला. त्यामुळे त्याच्या अंगावर दाह झाला. त्याने आरडाओरडा केला. खोलीचा दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला. मात्र आरोपीने खोलीचा दरवाजा बाहेरून बंद करुन पळून गेला होता. या घटनेची माहिती मिळताच सहायक पोलीस आयुक्त आरती बनसोडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीशकुमार दिघावकर यांनी घटनास्थळी भेट दिली. तरुणाने याबाबत सोमवारी (दि.२५) तक्रार दिली असून, सहायक पोलीस निरीक्षक रूईकर तपास करत आहेत. पोलिसांनी वसतिगृहातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी केलेले चित्रीकरण ताब्यात घेतले आहे.

# निवडणूकीच्या विविध टप्प्यांवर सुरक्षेच्या उपाययोजना करा- डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार

**पुणे । प्रतिनिधी**

महसूल प्रशासन आणि पोलीस प्रशासनाने परस्पर समन्वयाद्वारे निवडणुकीच्या विविध टप्प्यांवर सुरक्षेच्या आवश्यक उपाययोजना कराव्यात आणि निवडणुका मुक्त आणि भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठीचे नियोजन करावे, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात दूरदृष्य प्रणालीद्वारे आयोजित पुणे विभागाच्या निवडणूक आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस पुण्याचे जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे, सह पोलीस आयुक्त प्रविण पवार, पोलीस विशेष महानिरीक्षक सुनील फुलारी, अपर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, महसूल उपायुक्त वर्षा लड्डा-उंटवाल, शिरुर लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अजय मोरे आदी उपस्थित होते. डॉ.पुलकुंडवार म्हणाले, आदर्श आचारसंहिता आणि भारत निवडणूक



आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन होईल याकडे विशेष लक्ष द्यावे. त्यासाठी निवडणूक आराखडा योग्यरितीने तयार करावा आणि त्यात सूक्ष्म बाबींचाही समावेश असावा. आंतरजिल्हा आणि आंतरराज्य समन्वयासाठीदेखील योग्य नियोजन करावे. पैशाचा आणि बळाचा वापर होऊ नये आणि नागरिकांना निर्भयपणे मतदान करता येईल यादृष्टीने प्रतिबंधक उपाययोजना कराव्यात.युवक आणि ज्येष्ठ नागरिकांना मतदानासाठी प्रोत्साहीत करावे. पात्र मतदार मतदानापासून वंचित राहू नये याची दक्षता घेण्यासोबत मतदारांना त्यांचे मतदान केंद्र शोधण्याविषयी व्यापक जनजागृती करावी. उन्हाळ्यातील वाढते तापमान लक्षात घेता सकाळी आणि सायंकाळी दोन तास मतदानासाठी गर्दी होईल हे लक्षात घेऊन आवश्यक व्यवस्था करावी. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर मतदान कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचीही काळजी घ्यावी. क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष मतदान केंद्रांना भेट देऊन तेथील समस्या जाणून घ्याव्यात, असे निर्देशही विभागी आयुक्तांनी दिले.

यावेळी पुणे विभागातील जिल्हाधिकारी आणि वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दूरदृष्य प्रणालीद्वारे आपल्या जिल्ह्यातील निवडणूक तयारीची माहिती दिली. निवडणूक कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आणि प्रतिबंधात्मक कार्यवाहीवर विशेष लक्ष देण्यात येत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

## प्रसिद्ध फूड ब्लॉगर नताशा दिड्डेचे पुण्यात निधन

पुणे । प्रतिनिधी

प्रसिद्ध फूड ब्लॉगर नताशा दिड्डेचे रविवारी (दि. २४) पुण्यात निधन झाले. तिच्या पतीने इन्स्टाग्रामवर निधनाबाबतची माहिती दिली. 'द गटलेस फूडी' या नावाने नताशा सोशल मीडियावर प्रसिद्ध होती.



नताशाच्या इंस्टाग्राम बायोनुसार, नताशा दिड्डे एक प्रसिद्ध शेफ होती. तिला पोटाचा आजार असल्याची प्राथमिक माहिती आहे. नताशाच्या मृत्यूचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. तिच्या पतीने या पोस्टमध्ये दिलेल्या माहितीनुसार, जड अंतकरणाने मला हे सांगत आहे की, माझी पत्नी नताशा डिड्डी उर्फ द गुटलेस फूडी हिचे निधन झाले आहे. तिच्या निधनामुळे आमच्यावर दु:खाचे डोंगर कोसळले आहे, त्याने लिहिले.

# औंध जिल्हा रुग्णालयात चक्क रक्त गटाची अदलाबदल; रुग्णची परिस्थिती चिंताजनक, रुग्ण आयसीयूमध्ये दाखल

पुणे शहरातील औंध परिसरातील आसलेल्या औंध जिल्हा रुग्णालयात शनिवारी (दि. २३) रोजी उपचारासाठी दाखल असलेल्या शेजारी-शेजारी असलेल्या दोन रुग्णांना द्यायच्या रक्त गटाचीच अदलाबदली केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. परिचारिकेचा निष्काळजीपणा रुग्णांच्या जिवावर बेतणारा असून, या दोन्ही रुग्णांना अतिदक्षता विभागात ठेवण्यात आले आहे.

औंध येथील इंदिरा वसाहतीत राहणारे दत्तू सोनाजी सोनवणे यांना गुरुवारी (दि. २१) दुपारी औंध जिल्हा रुग्णालयात दाखल केले होते. त्यांना न्यूमोनिया झाल्याने श्वास घेण्यास अडचण येत होती. त्यांचे हात-पाय सुजलेले आणि पोट फुगलेले होते. त्यामुळे डॉक्टरांनी त्यांना दोन-तीन दिवस डमिट करण्याचा सल्ला दिला. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असतानाच शनिवारी (दि. २३) जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांनी त्यांची रक्त तपासणी केली आणि सोनवणे यांना रक्त चढवण्याची सूचना केली. शेजारीच असलेल्या दगडू कांबळे या रुग्णालाही रक्त चढवायचे होते.

सोनवणे यांचा रक्तगट ए पॉझिटिव्ह, तर कांबळे यांचा रक्तगट बी पॉझिटिव्ह होता. त्यांच्या नावाने रक्ताच्या पिशव्यादेखील आल्या. मात्र, संबंधित ड्युटीवरील परिचारिकेने निष्काळजीपणा करत सोनवणे यांची पिशवी कांबळे यांना, तर कांबळे यांची पिशवी सोनावणे यांना चढवली. विरुद्ध रक्त चढवल्याने त्यांना त्याचा रिक्शन झाल्यानंतर आणि नातेवाइकांनी तक्रार केल्यावर त्या रक्तपिशव्या तपासण्यात आल्यावर हा प्रकार उघडकीस आला, तत्काळ रुग्ण कांबळे व सोनावणे यांना उपचारासाठी अतिदक्षता कक्षात हलवण्यात आले. आता दोघांची प्रकृती स्थिर आहे, असे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागनाथ यमपल्ले यांनी सांगितले. मात्र आरोग्य कर्मचाऱ्याचा अशा प्रकारचा निष्काळजीपणा कितपत योग्य आहे त्याच प्रमाणे या घटने नंतर प्रशाशन कठोर कारवाई करणार कि नाही असा संतप्त प्रश्न नागरिक उपस्थित करत आहे.

# 'पुण्यातून सकल मराठा समाजाचा उमेदवार उभा करणार'

**पुणे । प्रतिनिधी**

राज्य सरकारने मराठा आरक्षणाची फसवणूक करत मराठा समाजाच्या मागण्या मान्य केलेल्या नाहीत. त्याविरोधात मराठा आरक्षणाचे संघर्षयोध्दा मनोज जरांगे यांनी आंदोलनाच्या माध्यमातून प्रत्येक मतदारसंघामध्ये मराठा उमेदवार उभा करावा, अशी घोषणा केली होती. त्या पार्श्वभुमीवर आज (दि.२६) पुण्यात झालेल्या बैठकीमध्ये पुण्यातून मराठा समाजाचा एक उमेदवार देण्याबाबत शिक्कामोर्तब करण्यात आला.

सकल मराठा समाजाच्या वतीने खंडोजी बाबा मंदिरामध्ये आज बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला पर्वती, वारजे, शिवाजीनगर, वडगावशेरी, धनकवडी, कोथरुड, कर्वेनगर, स्वारगेट, कात्रज, बाणेर, पाषाण या भागातील मराठा समाजाचे कार्यकर्ते उपस्थित होते. या बैठकीमध्ये मनोग जरांगे यांनी केलेल्या सूचनांवर चर्चा करण्यात आली. राज्य सरकारने मराठा समाजाला आरक्षण देतो असे सांगून ज्या मागण्या



आंदोलक म्हणून मनोज जरांगे पाटील यांनी केल्या. त्या मागण्यांकडे दुर्लक्ष करून जे मागितले नाही ते दहा टक्के आरक्षण देऊन समाजाची बोळवण केली आहे. त्यामुळे सरकारला मराठा समाजाची ताकद दाखविण्यासाठी प्रत्येक मतदारसंघातून एक उमेदवार देण्याबाबत चर्चा झाली असल्याचे या बैठकीतून स्पष्ट करण्यात आले.

पुणे लोकसभा मतदार संघामध्ये मराठा समाजाचा एक उमेदवार देण्यात येणार असून सर्व मराठा समाजाने संबंधित उमेदवाराच्या पाठिशी पुर्णपणे उभे राहायचे. त्यानुसार इच्छुक उमेदवारांचे फॉर्म भरण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. दि. १८ एप्रिलपासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात होणार आहे. दि. ३० मार्चपर्यंत इच्छुकांचे अर्ज भरुन घेऊन ते सर्व अर्ज मनोज जरांगे यांच्याकडे पाठविण्यात येणार आहेत. मनोज जरांगे हे उमेदवार जाहीर करणार आहेत. दरम्यानच्या काळात प्रत्येक प्रभागामध्ये छोट्या छोट्या बैठका घेऊन मराठा समाजाच्या मतांचाही विचार केला जाणार असल्याचे या बैठकीत ठरविण्यात आले.

**वसंत मोरेंची बैठकीला उपस्थिती**

सकल मराठा समाजाच्या वतीने मराठा समाजामधून एक उमेदवार देण्याबाबत चर्चा करण्यासाठी मराठा समाजातील बांधवांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला पुण्यातुन लोकसभेसाठी इच्छुक असलेले वसंत मोरे उपस्थितीत होते. त्यामुळे त्याठिकाणी राजकीय चर्चेला उधाण आले आहे.

पुणे लोकसभा मतदार संघासाठी मनोज जरांगे हे जो मराठा उमेदवार देतील. त्या उमेदवाराचा प्रचार आणि पाठिंबा आमच्याकडून कायम राहील. त्या उमदेवाराला विजयी करण्यासाठी सर्वच मराठा बांधव पाठिशी राहतील.

– सचिन आडेकर (समन्वयक, सकल मराठा समाज)

# सायबर गुन्ह्याचे बँकॉक कनेक्शन- सायबर सेलकडून चौघांना अटक

**पिंपरी । प्रतिनिधी**

शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्याच्या बहाण्याने महिलेची दहा लाख ६९ हजार ५७५ रुपयांची फसवणूक करण्यात आली. वाकड पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या या गुन्ह्यात सायबर सेलने चौघांना अटक केली आहे. पोलिस तपासात या प्रकरणाचे बँकॉक कनेक्शन असल्याचे समोर आले आहे. विकास नेमीनाथ चव्हाण (४३, रा. गणेशनगर, नवी सांगवी), प्रदीप कृष्णा लाड (३२, रा. पिंपळे गुरव, सांगवी), अमित जगदीशचंद्र सोनी, अहमद नजीर गाझी, अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

पोलिस उपायुक्त संदीप डोईफोडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, वाकड येथील एक महिला फेसबुकवर पोस्ट बघत असताना



तिला आयबीकेआर क्रेसेट अकादमी गोल्डमन सच, या नावाने व्हॉट्सॲप ग्रुप दिसला.

त्यावर क्लिक केले असता महिला ग्रुपला जॉईन झाली. ग्रुपमध्ये असलेल्या सदस्यांना दररोज गुंतवणुकीवर नफा होत असल्याचे फिर्यादी यांना दिसले. त्यामुळे महिलेने देखील आयबीकेआर सेक्युरिटीज या कंपनीत पैसे गुंतवण्याची तयारी दर्शवली. दरम्यान, आरोपींनी महिलेला लिंक पाठवून एक ॲप डाउनलोड करण्यास सांगितले. त्यावर महिलेने केलेली गुंतवणूक आणि नफा दिसत होता. मात्र, महिलेला पैसे काढता येत नव्हते. आपली फसवणूक होत असल्याचे महिलेच्या लक्षात आले. महिलेने वाकड पोलिसात धाव घेत दहा लाख ६९ हजार ५७५ रुपयांची फसवणूक झाल्याची तक्रार दिली. यांनी केली कामगिरी पोलीस उप-आयुक्त संदिप डोईफोडे, सहायक पोलिस आयुक्त विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक वैभव शिंगारे,

सहायक पोलिस निरीक्षक सागर पानमंद, सहायक पोलिस निरीक्षक प्रविण स्वामी, पोलिस उपनिरीक्षक सागर पोमन, पोलिस अंमलदार अतुल लोखंडे यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

# सहा वर्षांनंतर विभक्त पती-पत्नी पुन्हा एकत्र

**पुणे । प्रतिनिधी**

आजारपण ही तशी वाईट गोष्ट. मात्र, मुलीचे आजारपण दोघांच्या संसारासाठी वरदान ठरले. सहावर्षीय मुलीला डेंग्यू झाल्यानंतर तिला काही दिवस रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आले. या वेळी सहा वर्षे वेगळे राहणार्या दोघांनी रुग्णालयात मुक्काम ठेवला. घरी परतल्यानंतर मुलीने राहण्याचा हट्ट केल्याने आणखी काही दिवस दोघे घरी एकत्र राहिले. मुलीने मम्मी-पप्पा दोघेही हवे असल्याचे म्हटले अन् त्यानंतर दोघांनी आपापसुतील वाद विसरत पुन्हा नव्याने संसार सुरू करण्याचा निर्णय घेतला.

राज आणि सिमरन (दोघांची नावे बदलली आहेत) अशी दोघांची नावे आहेत.

दोघेही उच्चशिक्षित. आयटी क्षेत्रात कार्यरत. तो उत्तर प्रदेशचा तर ती पश्चिम बंगाल येथील. बंगळूरू येथे एका कंपनीत कामाला होते. सुरुवातीला मैत्री



आणि नंतर त्याचे रुपांतर प्रेमात झाले. दोघांनी २००९ मध्ये विवाहही केला. संसार सुरळीत सुरू असताना दोघे हिंजवडी येथे स्थलांतरित झाले. दोघांना २०१८ मध्ये एक मुलगी झाली. त्यानंतर राजची परदेश वारी झाली. दोघांत चारित्र्याच्या संशयावरून वाद होऊ लागले. वाद इतके विकोपाला गेले की, दोघे विभक्त राहू लागले. त्यानंतर, सिमरन हिने २०२० मध्ये प्रथमवर्ग न्यायदंडधिकार्यांच्या न्यायालयात त्याच्याविरोधात कौटुंबिक हिंसाचार कायद्यानुसार दावा दाखल केला.

तर त्यानेही वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश यांच्याकडे ॲड. प्रणयकुमार लंजिले, ॲड. अनिकेत डांगे आणि ॲड. लक्ष्मण सावंत यांच्यामार्फत घटस्फोटासाठी अर्ज केला. यादरम्यान, सहा वर्षे वेगळे राहणारे दोघे मुलीला डेंग्यू झाल्याने एकत्र राहिले. तिच्या भवितव्याचा विचार करत दोघांनी कायमस्वरूपी एकत्र राहण्याचा निर्णय घेतला. वकिलांनी केलेले समुपदेशन महत्त्वाचे ठरले. त्यांचा नात्यातील सहा वर्षांचा दुरावा संपला.